# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१२ |
| वर्ष | : | सत्तेचाळिसावे |
| अंक | : | दुसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१२**

**गणपत्रिका क्रमांक : १७२**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष सत्तेचाळिसावे अंक दुसरा जेष्ठ/आषाढ शके १९३४, जुलै २०१२

## *संपादकीय*

### भारतातला भ्रष्टाचार

भ्रष्टाचाराचा सध्या बोलबाला आहे. बोलबाला म्हणजे चर्चा. भ्रष्टाचाराचा अभ्यास करणाऱ्या 'ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल' या स्वयंसेवी संस्थेने १८२ देशांमध्ये भारताला ८७ वे स्थान दिले आहे. गौतम बुद्धापासून म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले आणि रा. शाहू यांच्या परंपरा सांगणाऱ्या या देशात ही बाब नक्कीच समाधानकारक नाही. अर्थातच व्यक्तिस्तोम आणि घोषणांच्या नशेत जगणाऱ्या देशात ही विसंगती अपरिहार्य आहे.

''लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांसाठी, लोकांतर्फे'' निवडलेली व्यवस्था. आजचे आपणच निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचे आचार व व्यवहार बघता ही गोष्ट शंभर टक्के खरी आहे. लोकसभेने अलीकडेच ६० वर्षे पूर्ण केली. लोकसभेचे पावित्र्य, सभासदांना मिळणारे अभय आणि त्यांचे विशेषाधिकार यांची उजळणी ऐकून आपले कान किटले आहेत. उठता बसता 'वर्गहीन' समाजाची चर्चा करणाऱ्या या सर्व महाभागांना स्वत:करता निर्माण केल्या गेलेल्या या विशेष व्यवस्थेबद्दल मात्र काहीही आक्षेप नाहीत. लोकांनी निवडून दिलेल्या ५४३ सभासदांपैकी सुमारे १५८ लोकसभा सभासदांवर गुन्हे दाखल आहेत (२६%); यापैकी ७४ सभासद (१४%) असे आहेत की ज्यांच्यावर खून, बलात्कार, खंडणी, इत्यादी गंभीर स्वरूपाचे आरोप आहेत. गरिबांचा कैवारी म्हणवणाऱ्या धर्मनिरपेक्ष अशा काँग्रेसच्या २०५ सभासदांपैकी ५% सभासदांवर आणि हिंदुत्व आणि संस्कृतीचा वसा घेतलेल्या भाजपाच्या १६% सभासंदावर असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. म्हणजे गुन्हेगारीच्या संस्कृतीमध्ये काँग्रेसपेक्षा भाजपा नक्कीच वरचढ आहे. सुमारे अर्ध्या शतकापूर्वी, म्हणजे १९६४ साली तत्कालीन भारत सरकारने भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे गठन केले होते. त्या अहवालात समितीने स्पष्टपणे सांगितले होते की, तत्कालीन कायदे करणारी रचना ही सक्षम नाही आणि असा भ्रष्टाचार थांबवण्यासाठी ती अपुरी आहे. अर्थातच.

(पृष्ठ क्र. ३१ वर)

**इकडे लक्ष द्यावे –**

**१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सभासद, वर्षात केव्हाही होता येते.**

२) आजीव सभासद योजना बंद करण्यात आली आहे. जे सभासद ३१ मार्च २००९ पर्यंत 'आजीव' झाले आहेत. त्यांना अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. त्यांनी एप्रिल २००९ पासून वाढवलेली देणगी विचारात घेऊन योग्य ती ऐच्छिक देणगी पाठवावी परदेशस्थ सभासदांनी ७५ $ देणगी पाठवावी, अशी विनंती आहे.

३) देणगी, मनीऑर्डर, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डी.डी.) **'सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट'** या नावाने खालील **पत्त्यावरच** पाठवावी.

**सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,**
द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय,
प्रताप सिनेमासमोर, कोलबाड,
ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१
कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते १ व सायं. ४ ते ७.

ट्रस्टचे बँक खाते ठाणे जनता सहकारी बँक लि. ठाणे भारत सहकारी बँक व भारतीय स्टेट बँक या बँकांमध्ये आहे. मुंबई व ठाणे बाहेरील सभासदांनी वरील बँकां व्यतिरिक्त बँकांवरील धनादेश पाठविल्यास वटणावळ ५० रु. अधिक पाठवावे.

देणगी पाठविताना संपूर्ण नाव, पत्ता व सभासद क्रमांक (सभासद असल्यास) ही माहिती सुवाच्य अक्षरात कळवावी.

**४) खालील ठिकाणी फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी मनीऑर्डर/धनादेश पाठवू नये.**

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**
कापडाचे व्यापारी,
१४८, प्रार्थना समाज, गिरगांव,
मुंबई – ४०० ००४.
दूरध्वनी : २३८८ ०६४५

**रविवारी बंद**

सद्धर्म अंकासंबंधी माहितीकरता यांच्याशी संपर्क साधावा.

ब) **श्री. प्रकाश भा. दीक्षित**
३०२, दुर्गा सोसायटी,
कोलबाड, ठाणे ४०० ६०१.
दूरध्वनी : २५४७२००५
दूरभाष : ९८१९६९३१९५

**५) पत्ता बदलला असल्यास ताबडतोब कळवावे.**

६) पाकिटावर सभासद क्रमांकासमोर छापलेल्या त्रोटक अक्षरांचा खुलासा.

१) वा. दे. – वार्षिक देणगीदार सभासद
२) आ. – आजीव सभासद
३) दी. का. – दीर्घकालीन सभासद
४) का.भे. – कायम भेट

'वा. दे.' व 'दी. का.' या अक्षरांसमोर देणगी कधी संपेल ते वर्ष दाखविले आहे.

– संपादक

या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या त्रैमासिकातील मजकूर संपादकांच्या परवानगीशिवाय कोणीही कुठेही छापू नये.
लेखकांनी या अंकातील त्यांचा लेख इतर ठिकाणी पाठविणे असल्यास, तो सद्धर्माच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे असा उल्लेख करावा.

– संपादक

***अनुक्रमणिका***


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| भारतीय युद्ध का लढवले गेले असावे! | ४ |
| गीतकृष्णायन - भाग २ | ७ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी मराठी म्हणी वाक्यप्रचार लेख १२ वा | ९ |
| गीता उपनिषदे (वेदान्त) आणि कपिल-सांख्यशास्त्र | ११ |
| पुनर्जन्म प्रमेय आणि प्रमाण | १६ |
| कपिल मुनींचा मातेला उपदेश (लेखांक ४) | २२ |
| ग्रंथ परिचय | २८ |
| अध्याय ६ : ध्यान योग | ३० |


**जानेवारी २०१२ ते मार्च २०१२ पर्यंत दीर्घकालीन सभासदासाठी व ऐच्छिक देणगी देणाऱ्यांची नावे**

**दीर्घकालीन सभासदासाठी**

१) पंडित विजयकुमार
२) व्यं. वा. कोटबागी, बडोदा
३) श्रीकांत बाळकृष्ण कर्वे, कल्याण
४) सिताराम मा. चंदावरकर, मुंबई
५) मधुछंदा राहूल काळे, माहीम, मुंबई
६) पंडित विजयकुमार, गिरगाव, मुंबई

१) सौ. शालीनी मराठे, गिरगांव, मुंबई ५०००/-
२) ठाणे भारत सहकारी बँक, ठाणे, १०,०००/-

वरील सर्व सभासदांचे आम्ही आभारी आहोत.

– संपादक

**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | |
|---|---|
| १) सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्‌बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) (पृष्ठसंख्या ९६) | रु.१५ |
| ९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) उपासना | रु. ४० |
| ११) श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) गंगालहरी | रु. २५ |
| १४) गणपत्यथर्वशीर्षातील व्याकरण | रु. ३० |
| १५) सांख्यदर्शन | रु. ५० |

**जुने सद्धर्म अंक मिळतील**

सद्धर्मचा पहिला अंक ऑगस्ट १९६५ ला प्रसिद्ध झाला. हा अंक व त्यानंतर ऑक्टोबर १९६५ पासून जानेवारी २०११ पर्यंतचे (एप्रिल १९७४ व जुलै १९७४ चे अंक सोडून) सर्व अंक 'www.Granthalaya.org' या संकेत-स्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुकाना ते download करून मिळू शकतील व त्यांची प्रतही तयार करून घेता येईल, याची नोंद घ्यावी.

एप्रिल १९७४ व जुलै १९७४ चे अंक काही अडचणीमुळे प्रसिद्ध झाले नाहीत.

## भारतीय युद्ध का लढवले गेले असावे!

वा. प. पटवर्धन

या ब्रह्माण्डांतील सर्व गोष्टींचा समतोल सतत कायम राखला जातो. नैसर्गिक समतोल बिघडला तर तो नियतीच्या/ प्रकृतीच्या मार्फत साधला जातो. सामाजिक, नैतिक अथवा धार्मिक तोल ढासळला तर ईश्वराला हस्तक्षेप करावा लागतो आणि कोणाच्या तरी माध्यमांतून बिघडलेली घडी नीट बसवली जाते.

महाभारत घडण्यापूर्वी समाजाचा नैतिक समतोल बिघडला होता. नीतीनियम डावलले जात होते. अनीती, अधर्माचे प्राबल्य वाढले होते. राजे महाराजे अनिर्बंध झाले होते.

**मथुरेचा राजा कंस** याने आपल्या पित्याला, उग्रसेनाला बंदिवान करून राजगादी बळकावली होती. बहिणीला पतीसहित तुरुंगात टाकले होते. स्वत:च्या मरणाच्या भीतीने तिची सहा नवजात अपत्ये शिलेवर आपटून ठार मारली होती. ती शिला व तो तुरुंग आजही मथुरेत पहायला मिळतो. त्याचे प्रजेवरील अत्याचार वाढत होते. सर्व प्रजेने आपल्याजवळचे दूध व दुधाचे पदार्थ सर्व मथुरेत आणले पाहिजेत. कारण राजधानीत ते मुबलक मिळाले पाहिजेत. प्रजेला नाही मिळाले तरी चालतील कंसाने तसा फतवाच काढला होता. त्याच्या दरबारातही त्याच्यावर नाराज असलेले सरदार होते. त्याला पाठबळ मिळाले होते ते त्याचा सासरा जरासंध याचे. त्याच्या पाठिंब्यामुळेच कंस उन्मत्त झाला होता.

**जरासंध** हा मगध देशाचा सम्राट होता आजचे पाटणा ही त्याची राजधानी होती तो नरमेध यज्ञ करणार होता. त्यासाठी त्याने ८६ लहान सहान राजे पकडून तुरुंगात ठेवले होते. १०० पूर्ण झाल्यानंतर त्यांचा यज्ञात बळी जाणार होता.

चेदि देशाचा राजा **शिशुपाल** हा जरासंधाचा मित्र होता परस्त्रियांवर नजर ठेवण्यापर्यंत त्याची मजल होती. जरासंधाच्या पाठिंब्यामुळे तो उन्मत्त बनला होता.

**कालयवन** हा परकीय राजा आक्रमक आणि अत्याचारी होता. तो सुद्धा जरासंधाचा मित्र होता.

आजच्या आसाममध्ये प्रागज्योतिषपूर नगर ही **नरकासुराची** राजधानी होती. त्याची जुलूम शाही वेगळीच होती. राजघराण्यांतील तसेच प्रतिष्ठित कुळांतील असंख्य कुमारिकाना त्याने बंदिवान केले होते. त्यांची संख्या सोळा हजार शंभर सांगितली आहे.

या सर्व राजमंडळाचे सम्राट होते हस्तिनापूर (दिल्ली) चे **कौरव** मोठा भाऊ धृतराष्ट्र जन्मांध असल्यामुळे धाकटा भाऊ पंडू राजा झाला. पण तो नेहमी लढाया व शिकार यातच गुंतलेला असे. म्हणून त्यानेच मोठ्या भावाकडे सन्मानाने राज्यकारभार सोपवला होता. पंडूच्या निधनानंतर त्याच्या पुत्रांचा हक्क असलेले ते राज्य राजा धृतराष्ट व त्याचे पुत्र यानी अन्यायाने बळकावले व ते सतत पांडवांचा नाश करण्यासाठी प्रयत्न करीत होते.

गांधार नरेश **शकुनी** कौरावांचा मामा होता. तो अत्यंत कपटी व द्यूतांत खोटेपणा करण्यांत प्रवीण होता. कपट द्यूत खेळून त्याने पांडवांना देशोधडीला लावले होते.

**अंगराज कर्ण** सुद्धा कौरवांच्या कपट कारस्थानांत सामील होता. कौरवांच्या प्रत्येक अन्यायी कृत्यांत कर्ण त्यांच्या बरोबर राहात असे. त्याचा मुख्य शत्रू अर्जुन होता.

समाजाला नैतिक व धार्मिक मार्गदर्शन करणारा ब्राह्मण वर्ग जुलमी राजांच्या दहशतीमुळे हतबल आणि लाचार बनला होता. त्याचे प्रतिनिधिक उदाहरण म्हणजे महापराक्रमी आणि महाविद्वान आचार्य द्रोण, अश्वत्थामा व कृपाचार्य. ही तीनही व्यक्तीमत्वे महान असूनही लाचार बनली होती. राजाकडून मिळणाऱ्या मानधनावर जगत होती. समाजाला व राजानासुद्धा मार्गदर्शन करणारा त्यागी, मानी आणि मान्यवर असा हा वर्ग जुलमी राजांचा आश्रित बनवला गेला होता.

अनीतीमान राजांचे अधिकारी सुद्धा राजाज्ञेने उन्मत्त बनून प्रजेवर जुलूम जबरदस्ती करीत होते. सामान्य प्रजानन मात्र भरडले जात होते व त्यातील संधीसाधू अनीतीमान बनत होते.

अध्ययन अध्यापन करणारा, अनासक्त असल्यामुळे प्रसंगी राजानाही ठणकावणारा तेजस्वी ब्राह्मणवर्ग स्वत्व हरवून लाचार बनला होता. राजा व त्याचे प्रतिनिधी राजाज्ञेने दडपशाही करीत होते. सामान्य प्रजाजनांसमोर असणारे आदर्श हे असे होते.

या सर्व जुलमी व अनीतीमान राजसत्ता नष्ट करुन त्या जागी नीती नियमांचे पालन करुन प्रजेला सांभाळणारी न्यायप्रिय अशी सत्ता आणणे आवश्यक बनले होते.

अधर्म वाढला म्हणजे ईश्वराचा अवतार होतो. दुष्ट शक्तीचे परिपत्य करून, सज्जन शक्तीला पाठिंबा देणे व धर्माची घडी पुन्हा नीट बसवणे हे ईश्वरी अवताराचे कार्य असते.

श्रीकृष्णाच्या रुपाने आठवा अवतार त्याचसाठी झाला होता. श्रीकृष्णानी तरुण वयातच कंसाला स्वत: मारले होते. जरासंधाला भीमा करवी मारविले. कालयवनाला मुचकंद ऋषी कडून भस्मसात करविले नरकासुराला समोरासमोर युद्ध करुन स्वत:च मारले होते. शिशुपालाचे शंभर अपराध राजसूग यज्ञाच्या वेळी भरले व त्याला स्वत: मारले.

अशा प्रकारे या सर्व महाबलाढ्य राजांना प्रत्येकाचे अपराध जाहीरपणे सांगून श्रीकृष्णानी नष्ट केले. त्यांच्या वधाची कारणे इतर सर्व राजाना समजल्यावर त्याना जीवाच्या भीतीने का असेना पण न्याय नीतीचे पालन करावेच लागले. त्यामुळे समाजावरही त्याचा इष्ट तो परिणाम झाला.

शिल्लक असलेले अनीतीमान राजघराणे म्हणजे आंधळा धृतराष्ट, त्याचे दुष्ट व कपटी पुत्र, सल्लागार मदतगार. त्यांची राजधानी हस्तिनापूर (दिल्ली) हे राज्यसुद्धा नष्ट होणे आवश्यक होते. यानंतरच तेथील सज्जन शक्तीचा अभ्युदय होणार होता.

हे झाल्यानंतर श्रीकृष्ण अवताराचे ''परित्राणाय साधूनाम् च विनाशाय दुष्कृताम्'' हे अर्धे कार्य होणार होते. ''धर्मसंस्थापनार्थाय'' हे उरलेले कार्य होण्यासाठी सामान्य जनाना धर्म, अध्यात्म, ईश्वर, मोक्ष इत्यादि विषयांची ओळख होणे आवश्यक होते. जिज्ञासू सज्जनाना भक्तिमार्गात प्रगती करण्यासाठी या विषयांचे समग्रज्ञान मिळणे हे त्याहीपेक्षा महत्त्वाचे होते. कारण असे भक्त संख्येने नगण्य असले तरी ही

समाजाची खरी धारणाशक्ती तीच असते.

सामान्य सज्जन मनुष्याला जिज्ञासू आणि जिज्ञासूला ज्ञानी बनवण्यासाठी भगवंताना ज्ञानभांडार खुले करायचे आहे. सर्वत्र विखुरलेले ज्ञान एकत्र करून सुसूत्र पणे आणि सुसंबद्ध पणे सर्व समाजाला सांगावयाचे आहे. समाजांत स्थैर्य, शांतता व सुबत्ता असेल तरच शास्त्रचर्चा होऊ शकते त्यासाठी हे शेवटचे साम्राज्य ही नष्ट होणे आवश्यक होते. त्यानंतरच या ज्ञान भांडाराचा उपयोग होणे शक्य होते.

ईश्वरी नियोजनाप्रमाणे यासाठी ठरलेला प्रसंग आहे भारतीय युद्धाचा पहिला दिवस. युधिष्ठिर शकपूर्व १, मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला सूर्योदयाच्या मुहूर्तावर श्रीमत् भगवत्गीता रुपी ज्ञानसूर्याचा उदय झाला आहे.

आपल्या अवताराची उरलेली कार्यपूर्ती होण्यासाठी भगवंतानी प्रकृतीमार्फत, आवश्यक असे प्रसंग, त्याना पूरक पोषक अशी पात्रे, त्यांचे बरेवाईट कर्तृत्व व या सर्वांचे युद्धांत होणारे पर्यवसान, या सर्व गोष्टी घडवून आणल्या आणि महाभारतीय युद्ध घडवून आणले.

श्री भगवंताच्या मनांत काय असेल याबद्दल आपण फक्त तर्कच करू शकतो. त्यानी योजल्याप्रमाणेच सर्व घडून येते आणि ते मानवाच्या हिताचेचे असते हे मात्र नक्की.

**– वा. प. पटवर्धन**
द्वारा जया डी. शहा, अे – १/११,
महावीर नगर, आयकॉन हॉस्पिटल समोर
मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व)

●●●

## आपली शब्दसंपदा

१) कल – जाणे, ओढणे, कळणे यावरून आकलन, उत्कलन. 'ये गत्यर्थास्ते ज्ञानार्थी: । म्हणजे ज्या धातूंचा अर्थ जाणे असा आहे त्यांचा जाणणे असा अर्थ होतो. संस्कृतातील या नियमास अनुसरून कळणे याचा अर्थ जाणणे असा झाला आहे.

२) कुंकम – केशर. केशर हा उत्तम सुगंधी पदार्थ असल्यामुळे कपाळी लावण्याचा प्रघात पडला. परंतु केशर महाग असल्यामुळे हळदीची पिंजर करतात त्याला कुंकू म्हणण्याचा प्रघात पडला.

३) कुटी – झोपडी, यावरून पर्णकुटी. कुडी जीवाचे घर अशा अर्थाने देहास कुडी म्हणण्याचा परिपाठ पडला.

४) कुष्ठ – कोड, कित्येक संस्कृत शब्दातील उकाराचा ओकार होतो. जसे – पुष् – पोसणे, सुवर्ण – सोने, शुंडा – सोंड, कूर्पर – कोपर कूष्मांड – कोहळा.

५) कृपा – कीव, दया. संस्कृमध्ये कित्येक शब्दास ''आलु'' प्रत्यय लावतात उदा. कृपालू. त्याचाच अपभ्रंश मराठीत ''आलु'' हा प्रत्यय आहे. स्वप्नाळु, विसराळु, दयाळु

**– दि. दा. औटी**

# गीतकृष्णायन - भाग २

प्रसाद औटी

'क्रुरकर्मा' – जाती समुदितमदना

ब्रह्मावर्ती यमुनातीरी वसे नगरी मथुरा
उग्रसेन नामे राजा वाहे नगरीची धुरा
कंस म्हणोनि त्या राजाचा जुलमी कुलदीपक
निर्दय त्याची वृत्ती होती सज्जनांसि घातक ।।१।।

एके दिवशी त्या कंसाने राजाला पकडले
कैदेमध्ये डांबुन मथुरा राज्या बळकावले
तेव्हापासुन होउ लागली अधर्माची सरशी
मथुरेमध्ये ऐशा समयी पातले देवर्षी ।।२।।

नारद म्हणती जुलमी कंसा हितचिंतक मी खरा
घाट घालती स्वर्गी करण्या सर्वनाश तव पुरा
म्हणती कंसा संहरण्याला विष्णूला पाठवा
पुत्र म्हणोनि जन्मा येई देवकिचा आठवा ।।३।।

ऐकोनी देवर्षी वाणी कंस मुठी आवळी
वसुदेवा अन देवकिस करी बंदी एका स्थळी
कारावासा असती त्यांच्या दिवसरात्र पाहरे
निर्मळ ते जोडपे प्रभूसी अविरत तेव्हा स्मरे ।।४।।

यथावकाशे प्रसूत जेव्हा ती साध्वी जाहली
कंसाने संतती त्वरित ती यमसदना धाडली
ऐसे त्या दुष्टाने केले सहा वार जेधवा
गर्भ गळे सातवा भयाने देवकिचा तेधवा ।।५।।

अखेर जेव्हा त्या मातेला पुन्हा गर्भ राहिला
वधण्या त्या बाळा मथुरानृप उतावीळ जाहला
आठवणीने ह्या बाळाच्या निद्रसी अंतरला
दैव हसे मग दुष्टाच्या पापाचा घडा भरला ।।६।।

कंसाच्या भयानं वसुदेवानं आपली ज्येष्ठ पत्नी रोहिणी हिला गर्भवती राहिल्यावर मथुरेनजीकच्या गोकुळ या गवळीवाड्याचा पाटील आणि परमस्नेही नंद याच्याकडे पाठवलं. यथाकाल रोहिणी तिथे प्रसूत झाली. त्या देखण्या आणि गुटगुटीत बाळाचं नाव संकर्षण अथवा बलराम असं ठेवण्यात आलं.

देवकी आता आठव्या खेपेला गर्भवती राहिली. ही वार्ता कळताक्षणी कंसाची झोपच उडाली. त्यानं महालाभोवतीचे पहारे अधिक कडक केले. महालात आपल्या खास विश्वासातल्या दासदासींचा अहोरात्र राबता सुरू केला. देवकी वसुदेवाचा विलक्षण मानसकि छळ सुरू केला. तो आशा करू लागला की या छळानं देवकीचा आठवा गर्भही सातव्यासारखाच जन्माआधीच गळून पडेल...

पण आठवा गर्भ राहिल्यापासून देवकी मात्र एका अनिर्वचनीय आणि अभूतपूर्व अशा आनंदाच्या आणि शांतीच्या सागरात डुंबू लागली. तिला कंसाचा छळ जाचेना झाला. तिच्यावर नजर ठेवून असलेल्या दासदासींना आणि पहारेकऱ्यांना ती त्याचंच कुशल विचारू लागली. त्यांना कळेना की आत्तापर्यंत दुःखाची आणि करूणेची प्रतिमाच जणु असलेली ही देवकी नखशिखांत बदलली कशी? वात्सल्यमूर्ती, कारुण्यसिंधू, नित्यशांत, नित्यतृप्त झाली कशी? तिला कंसाच्या अनन्वित छळामुळे निश्चितच भ्रम झाला असला पाहिजे किंवा एखाद्या महाभूतानं पछाडलं असलं पाहिजे असा त्यांनी स्वतःचा समज करून घेतला.

प्रत्यक्ष वसुदेवालाही देवकीमधला हा फरक जाणवला आणि मोठ्या उत्सुकतेनं,

काळजीनं, प्रेमानं त्यानं विचारलं, ''प्रिये, अलिकडे एका वेगळ्याच मनोहर विश्वात वावरत असल्यासारखं तुझं वर्तन झालंय. कारागृहातल्या आणि गर्भावस्थेतल्या गैरसोयींचा, हालांचा आणि दु:खांचा लवलेशही तुला शिवत नसल्यासारखंच तुझं चालणं बोलणं चालू आहे. तू बरी आहेस ना?''

सद्‌गदीत होऊन देवकी म्हणाली, ''नाथ, का कोण जाणे पण मी निश्चिंत झाल्येय, तृप्त झाल्येय, सुखी झाल्येय. माझ्या अंतर्मनातून अत्यंत शुभ असे संदेश येतायत. त्यांची तीव्रता एवढी प्रखर आहे की माझं बहिर्मन त्यांनी पूर्ण व्यापलंय. काहीतरी अतिशय आनंददायी, सर्व जनांच्या हिताचं आणि मंगल घडू घातलंय असं मला सारखं वाटतंय.''

अश्रूपूर्ण नयनांनी वसुदेव त्यावर म्हणाला, ''तथास्तु देवकी, तथास्तु!''

श्रावण वद्य अष्टमी. पाऊस शतधारांनी कोसळत होता. वारा दावं सुटलेल्या वासरासारखा मोकाट झाला होता. दिवेलागणीची वेळ झाली पण वारा एकही दीप टिकू देईना. सगळीकडे पाणीच पाणी झालं. रात्र अधिकाधिक गडद होऊ लागली. पहारेकरी, दासदासी यांना सृष्टीच्या त्या आकांडतांडवापुढे काय करावं हेच सुचेना. त्यांची गात्रं बधिरली, विचारशक्तीदेखील गोठल्यागत झाली.

आणि देवकी? तिचं तर जणू भानच हरपल्यासारखं झालं होतं...

'कृष्णजन्म' – वृत्त वसंततिलका

अन्याय कंस करता नियता म्हणाला
आंदोळलीच धरती लय धर्म झाला
सांगेन नेत्र तिसरा उघडी शिवाला
निर्दाळण्यास कपटा अवतार झाला ।।१।।

सामान्य लोक असती जरिही निराश
अंधार रात्र तरिही उगवे प्रकाश
लंकेसमान मथुरा स्थल बंदिशाला
सांभाळण्या गुणिजना हरिजन्म झाला ।।२।।

पर्जन्य तांडव करी भयभीत सारे
गुंगीमधे पहुडले असता पहारे
रात्रीत त्या बिकट श्रावण अष्टमीला
उद्धारण्यास सकलां जगमित्र आला ।।३।।

पाणी खळे न नयनी असहाय आई
बाळास त्या उचलुनी वसुदेव घेई
नेई उदास हृदये मग गोकुळाला
संहारण्यास दुरितां यदुश्रेष्ठ आला ।।४।।

नंदाघरी प्रसवली दुहिता यशोदा
घेई तिला निजसवे नकळेच नंदा
ठेवोनि मोहन पिता मथुरे निघाला
देण्या सुखा मुनिवरां हृषिकेश आला ।।५।।

मारावयास दुहिता जव कंस आणी
कंसास दे निसटुनी झणि शापवाणी
ऐकोनि तो चरकला भयभीत झाला
कंसास त्या कुचलण्या जगदीश आला ।।६।।

(क्रमश:)

**– प्रसाद औटी**
फ्लॅट नं १८, बि. नं. 3-B1, न्यू अजंठा
अव्हेन्यू, पौडरोड, कोथरूड, पुणे ४११०३८
मो. ९८८११०४०७४

●●●

 दि. दा. औटी

**वैश्वानरोऽपि लोहस्थ: कारूकैरभिहन्यते ।।**[२१५]

कथा कोणाची व्यथा कोणाला.

सुभाषिताची पहिली ओळ – कुस्थानस्य प्रवेशेन गुणवानपि पीड्यते । शब्दार्थ – वैश्वानर – अग्नी, लोहस्थ; लोखंडाला दिलेला अग्नी कारूक – कारागीर, अभिहन्यते – घाव मारले जातात.

भाषांतर – गुणवान माणूस अयोग्य ठिकाणी सापडला तर त्याला होणारा त्रास सहन करावा लागता. लोखंडाला आकार देण्यासाठी लोहार लोखंड तापवून त्यावर घाव घालतो पण अग्नीला ते सहन करावे लागतात.

**नक्र:स्वस्थानमासाद्य गजेन्द्रमपिकर्षति ।**[२१६]

अपनी गली मे कुत्ता भी शेर बन जाता है । (ऊर्दू म्हण)

सुभाषिताची दुसरी ओळ – स एव प्रच्युत: स्थानाच्छुनापि परिभूयते । शब्दार्थ – नक्र – मगर, गजेन्द्र – श्रेष्ठ हत्ती, स्थानात् – ठिकाणाहून शुना – कुत्र्याने, परिभूयते – पराभूत केला जातो.

भाषांतर – मगर पाण्यात असली म्हणजे तिथून ती श्रेष्ठ हत्तीला देखील ओढून नेवू शकते पण तीच जर जमिनीवर असेल तर कुत्रा सुद्धा तिचा पराभव करू शकतो.

**न हि तुम्बीफलविकलो वीणादण्ड: प्रयाति माहिमानम् ।**[२१७]

कोणाच्या तरी संगतीनेच एखाद्याला महत्त्व प्राप्त होते. सुभाषिताची पहिली ओळ – वंशभवो गुणवानपि सङ्गविशेषण पूज्यते पुरूष: । शब्दार्थ / भाषांतर – वंश – बांबू संगविशेषण विशिष्ट संगतीमुळे तुम्बीफल – भोपळा विकल – विरहित. उत्तम बांबूचा दांडा असला तरी भोपळ्याच्या संगतीशिवाय त्याला महत्त्व येत नाही. जेव्हा दांडा आणि भोपळा यांचा संयोग होऊन वीणा तयार होते तेव्हांच दोघेही महत्त्वपूर्ण ठरतात.

**यो यस्य प्रीतिर्न हि तस्य दूरम् ।।**[२१८]

हृदयापासून जेथे प्रेम असते तेथे अंतर गौण असते. पूर्ण सुभाषित – गिरौ कलापि गगने च मेघो

लक्षान्तरे भानुरूदेति पद्मम् ।
राशी द्विलक्ष: कुमुदश्च प्रीति:
यो यस्य प्रीतिर्न हि तस्य दूरम् ।।

मोर पर्वतावर असतो आणि ढग आकाशात पण त्याला पाहून मोर नाचू लागतो सूर्यलक्षावधी मैल अंतरावर आहे पण तो उगवला की कमळे उमलतात. चन्द्र देखील दूर अंतरावर आहे पण कुमुदे (चन्द्रविकासी कमळे) चन्द्र उगवला की रात्रविकासी कमळे उमलतात. प्रेम हे अंतरावर अवलंबून नाही.

**कोऽर्थ : पुत्रेण जातेन यो न विद्वान्न धार्मिक: ।**[२१९]

मुलगा असून उपयोग काय जर तो विद्वान किंवा धार्मिक नसेल तर?

सुभाषिताची पहिली ओळ – किं तया क्रियते धेन्वा या न दोग्ध्री न गर्भिणी । शब्दार्थ – धेनु – गाय, दोग्ध्री – दुध देणारी, गर्भिणी – गाभण राहणारी

भाषांतर – अशा मुलाचा उपयोग काय जो अर्थार्जन करीत नाही आणि अशा गाईचा तरी उपयोग काय जी दूध देत नाही.

**दैवे विमुखतां याते न कोडप्यास्ति सहायवान् ।** [२२०]

दैव प्रतिकूल असेल तर कोण मदत करणार?

सुभाषिताची दुसरी ओळ – पिता माता तथा भार्याभ्रात सहोदरः ।। वडील, आई, बायको, भाऊ, नातेवाईक कोणीच मदत करीत नाहीत.

**भवितव्यं भवत्येव कर्मणामीहशी गतिः ।** [२२१]

नशिबात असतील तशा गोष्टी घडणारच.

सुभाषिताची पहिली ओळ – विपत्तौ किं विषादेन संपत्तौ हर्षणेन किम्? संकटात दुःख काय मानायचे आणि उत्कर्षकाळात आनंद तो काय मानायचा?

**दैवमत्रातिरिच्यते ।।** [२२२]

दैवा पुढे कोणाचे काही चालत नाही.

पूर्ण सुभाषित – अचिंतितानि दुःखानि यथैवायान्ति देहिनाम् ।
सुखान्यपि तथा मन्ये दैवमत्रारिच्यते ।।

सुभाषितकार म्हणतात मनात नसलेली दुःखे अचानक येऊन उभी राहतात त्याचप्रमाणे सुखे ही मग त्यांचे काय वाटून घ्यायचे.

**अवश्यं भाविनो भावा भवन्ति महतामपि ।** [२२३]

अहो, जे घडायचे आहे ते मोठमोठ्यांनाही चुकलेले नाही.

सुभाषिताची दुसरी ओळ – नग्नत्वं नीलकण्ठस्य महाहिशयनं हरेः ।।

शंकरासारख्या महादेवाला वस्त्रहिन राहावे लागणे आणि विष्णूला सापावर झोपावे लागणे यावरून वरील विधानाची सत्यता पटते.

क्रमशः

**श्री. दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३ विठ्ठल मंदिराजवळ,
मु. पो. मुद्रेखुर्द, ता. कर्जत
जि. रायगड ४१० २०१.
दूरध्वनी : ०२१४८–२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

**सुखाची तळमळ**

*मानस मानसापरी अगाध ।*
*शान्त विशुद्ध विशाल ।*
*तयीं बुद्धिजविकारकल्लोळ । उठों नेदी ।।*

मन मानससरोवरासारखें अगाध असावें. ('अगाधम् अतलस्पर्शे' ज्याचा तळाचा थांगपत्ता लागत नाहीं इतकें विशाल आणि खोल असते ते अगाध) तें शान्त विशुद्ध व विशाल असावे. त्याच्यावर बुद्धि – बुद्धिवादमूलक विकारांचे कल्लोल निर्माण होतील असें करू नका.

# गीता उपनिषदे (वेदान्त) आणि कपिल-सांख्यशास्त्र

प्र. सि. मराठे
उत्तरार्ध

एप्रिल २०१२ च्या अंकातील या लेखाच्या पूर्वार्धात शेवटच्या परिच्छेदात 'सर्व उपनिषदांचा समन्वय साधणाऱ्या गीतेला तींत सांगितलेल्या कर्मयोगाच्या महत्त्वामुळे व नवव्या अध्यायात निरूपिलेल्या राजविद्या राजगुह्य योगामुळे वेद व वेदान्तापेक्षाही विशेष महत्त्व प्राप्त झाले असे म्हटले होते. ते कसे ह्याचाच विचार, लेखाच्या या उत्तरार्धात करावयाचा आहे.

इहलोकांत व स्वर्गात निरनिराळे सुखोपभोग मिळविण्यासाठी वेदांतील कर्मकाण्डात निरनिराळे यज्ञविधी सांगितले आहेत. त्यामुळे राजे-रजवाड्यांपासून सामान्य जनांपर्यंत सर्व लोक या कर्मकाण्डाकडेच जास्त आकर्षित होऊ लागले. वेदांतील ज्ञानकांडाकडे लोकांचे दुर्लक्ष होऊ लागले. ज्ञानकाण्डाचा अभ्यास काही थोड्या ब्रह्मवृत्तीच्या व योगाभ्यास करणाऱ्या जिज्ञासूच्या पुरताच सीमित राहिला. याप्रमाणे काही काळानंतर तर सामान्य लोकांना वेदविद्येचा परिचय केवळ कर्मकाण्डातूनच होऊ लागल्यामुळे, पुढे वेद् म्हणजे 'यज्ञविधी' अशीच भावना लोकात रूढ होत गेली. यज्ञ म्हणजे अग्नीत तुपाची, अन्नाची किंवा पशूची आहुती देणे असाच अर्थ जनमानसात दृढ होत गेला.

या पार्श्वभूमीवर गीतेने मात्र प्रथमच यज्ञाचा खरा अर्थ लोकांना समजावून सांगितला असे म्हणावे लागेल. यज्ञाचा खरा अर्थ नि:स्वार्थपणे केलेले त्यागमय कर्म असा आहे. व असे त्यागमय कर्म ईश्वराला अर्पण केले असे दर्शविण्यासाठी (किंवा त्या निमित्ताने) अग्नीत आहुती देणे हा केवळ लाक्षणिक (Symbolic) उपचार आहे. जसे ज्या वस्तूचे दान करावयाचे त्या वस्तूवर आपण हाताने पाणी सोडण्याचा उपचार करतो. कोणत्याही गोष्टीचा 'नि:स्वार्थपणे त्याग करणे' या अर्थी 'पाणी सोडणे' असा वाक्प्रचारही रूढ झाला आहे. यज्ञाचा 'त्यागमय कर्म' हा अर्थ विशद करून दाखविण्यासाठी, गीतेच्या चवथ्या अध्यायात 'भगवान' यज्ञाचे निरनिराळे प्रकार कथन करतात.

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथाऽपरे।
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतय: संशितव्रता: ।।२८ ।।

धर्मशाळा, उद्याने रुग्णालये वगैरे समाजकल्याण-उपक्रमांसाठी नि:स्वार्थ बुद्धीने द्रव्य दान करणे हा सुद्धा एकप्रकारचा यज्ञच (द्रव्ययज्ञ) आहे. शारीरिक स्वास्थाचा त्याग करून तप करणे हा सुद्धा गीतेला यज्ञच अभिप्रेत आहे. इन्द्रियांना विषयांपासून दूर खेचून योगाभ्यास करण्यासाठी विषयभोगांचा त्याग करणे हा सुद्धा योगयज्ञच होतो. त्याच न्यायाने विद्यार्थीदशेत T.V. सिनेमा या सारख्या आकर्षणांवर मात करून विद्याभ्यासावर मन एकाग्र करणे हा सुद्धा विद्यायज्ञच होईल. आत्मज्ञान मिळविण्यासाठी इन्द्रियदमन करून ईश्वरावर मन एकाग्र करुन ते निश्चल करणे हा तर सर्वांत श्रेष्ठ असा ज्ञानयज्ञ होतो असे गीता सांगते.

गीतेच्या तिसऱ्या अध्यायात कर्मयोगावर विवेचन करताना गीता सांगते -

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धन: ।
तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंग: समाचार ।।९ ।।

यज्ञार्थ म्हणजे जे कर्म दुसऱ्याच्या, समाजाच्या हितासाठी नि:स्वार्थ बुद्धीने केले जाते, अशा कर्माला कर्मबंधाचा दोष लागत नाही. म्हणजे अशा कर्माचे कर्मत्वच नाहिसे होते, आणि म्हणूनच भगवान कृष्ण अर्जुनाला सांगतात की, असे यज्ञार्थ कर्म कर्मबंधाची कोणतीही भीती न बाळगता तू मुक्तसंग करीत रहा. यज्ञकर्माची अशी व्यापक आणि त्यातील मर्म सांगणारी गीतेने केलेली व्याख्या हे गीतेचे फार मोठे वैशिष्ट्य म्हणावयास पाहिजे. एवढे झाले तरी पुढील काळात काम्यहेतूनेच यज्ञ केले जाऊ लागले व त्यांत बऱ्याच आक्षेपार्ह रुढी रुजवण्यात आल्या व त्या उपचारात पशुहत्येचाच अतिरेक होऊ लागला. आणि त्या पार्श्वभूमीवरच, जैन व बौद्ध विचारांना समाजजातील काही वर्गांत विशेष मान्यता मिळू लागली होती. या सनातन धर्मविरोधी लाटेला श्री आदिशंकराचार्यांच्या धर्मप्रसार कार्यामुळेच खरा रोख बसु शकला आणि त्या कार्यासाठी त्यांनी गीतेतील तत्त्वज्ञानच त्यांच्या शांकरभाष्यात लोकांना समजावून सांगितले. असा हा गीतेचा महिमा आहे.

इतर उपनिषदांच्या तुलनेत गीतेचे दुसरे आगळेवेगळे वैशिष्ट्य म्हणजे गीतेच्या ९ व्या अध्यायात भगवंताने सांगितेली 'राजविद्या' किंवा कोणत्याही माणसास आचरण्यास सोपा असा सांगितलेला 'राजगुह्ययोग' वेदांनी त्रिवर्गांसाठीच मोक्षमार्ग दाखविला होता. परंतु गीतेने

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्यु: पापयोनय: ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ।।३२।।

**मराठीत –**

माझा आश्रय घेऊनी पापयोनीही मानव ।
शूद्र वैश्य स्त्रियाही त्या पावती स्थान शाश्वत ।।३२।।

असे सांगून समाजातल्या सर्व थरातल्या लोकांना मोक्षाचा सोपा मार्ग दाखवून दिला आहे.

गीतेच्या दुसऱ्या व तिसऱ्या अध्यायात सांगितलेला 'कर्मयोग' वर वर पहाता सोपा वाटला तरी आचरण्यास मात्र तो फारच कठीण आहे. असा हा कर्मयोग ज्ञानयोगापेक्षाही वरचढ आहे असे गीतेने ५ व्या अध्यायात असंदिग्ध विधान केले आहे. परंतु सामान्य प्रापंचिकास असा कर्मयोग आचरणे अत्यंत कठीण आहे. संसार म्हटला की कुटुंबाचे पालन पोषण करण्याचे कर्तव्य आलेच. मग त्या पाठोपाठ अर्थाजन करणेही गरजेचे होते, मग सामान्य प्रापंचिकाला त्या अर्थाने कर्मयोग कसा आचरता येणार? सामान्य प्रापंचिकाची ही अडचण लक्षात घेऊनच गीतेच्या ९ व्या अध्यायात भगवन्ताने कर्माला ज्ञान-भक्तीची जोड देऊन कर्मयोगाचाच सुधारित प्रकार म्हणून राजगुह्ययोग (ज्ञान कर्म भक्ती समुच्चय योग) सांगितला आहे. कोणत्याही पूजनात वा साधनेत पुष्प-गंध-धूप-दीप अशा बाह्यात्कारी गोष्टी सहाय्यभूत होत असल्या तरी त्यांच्यापेक्षा भक्ताच्या (साधकाच्या) मनातील ईश्वराबद्दल असलेला भाव किंवा अनन्यभक्ती जास्त महत्त्वाची आणि सिद्धीसाठी अत्यंत गरजेची असते, हा महत्त्वाचा सिद्धांत गीतेने प्रतिपादन केला आहे. भगवान म्हणतात –

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नमि प्रयतात्मन: ।।२६।।

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यासि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।।२७।।

शुभाशुभफलैरे वं मोक्ष्य से कर्मबन्धनै: ।
संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ।।२८।।

**मराठीत –**

पर्णा पुष्पा फला तोया भक्तीने वाहि जो मला ।
आनंदे सेवितो मी ती भक्ताची भेट पार्थ त्या ।।२६।।

जे जे तू करिसी पार्था करिसी यज्ञ भोजन ।
करिसी दान तप जे, कर ते मज अर्पण ।।२७।।

असे वागता बाधेना फल–कर्म शुभाशुभ ।
करता योगयुक्तीने कर्म, तू मिळशी मज ।।२८।।

एखाद्या श्रीमंत व्यापाऱ्याने लोकांनी आपल्याला दानशूर म्हणावे, आपले नांव सर्वत्र व्हावे या हेतूने आपल्या मुनिमाकरवी १ मण पेढ्यांचा नैवेद्य दाखवून मंदिरात आलेल्या सर्व लोकांना, आपले नांव छापलेल्या पुड्यांतून वाटलेल्या पेढ्यांपेक्षा, एखाद्या अत्यंत दरिद्री माणसाने अनन्य भक्तिभावाने वाहिलेल्या साध्या फुलाने (परमेश्वर) मी जास्त संतुष्ट होतो. भगवान पुढे म्हणतात साध्या फुलाने (परमेश्वर) मी जास्त संतुष्ट होतो. भगवान पुढे म्हणतात– प्रपंचात वागताना जे जे कार्य – कर्तव्य तुझ्यापुढे उभे राहील. (पैसे मिळविण्यासाठी कष्ट करणे असो, उदरभरणासाठी भोजन असो, किंवा पूजादानधर्मादी धार्मिक कार्य असो) ते ते तूं माझ्याच आज्ञेने करीत आहेस असे समजून तू सर्वबलबुद्धी पणाला लावून ते कर्म कर व ते मलाच अर्पण कर. अशा योग युक्तीने प्रपंचातील कर्तव्ये पार पाडत राहिलास तर तुझी पारमार्थिक मार्गावर प्रगती होत राहून एके वेळी तूं मलाच येऊन मिळशील, तुला मोक्ष प्राप्त होईल, असे भगवान खात्रीपूर्वक सांगून प्रापंचिकाला मोठाच दिलासा देत आहेत. याप्रमाणे गीतेच्या नवव्या अध्यायात सांगितलेला राहगुह्ययोग हेच गीतेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. म्हणून या ९ व्या अध्यायालाच ज्ञानोबा गीतेच्या अध्याय माळेतला (मधला) मेरुमणी मानतात. संपूर्ण महाभारतात (१ लक्ष श्लोकांत) जे ज्ञान भरले आहे ते सर्व भगवद्गीतेत संकुचित स्वरुपात एकवटलेले आहे. आणि गीतेच्या ७०० श्लोकांत जे ज्ञान भरले आहे त्याचा एकत्र साठा एकट्या नवव्या अध्यायात ठेवलेला आहे, असे ज्ञानोबा ज्ञानेश्वरीच्या १० व्या अध्यायाच्या ३१ व्या ओवीत म्हणतात.

तिये आघवांचि जें महाभारती । तें लाभे कृष्णार्जुनवाचोक्तीं ।
आणि जो अभिप्रावो सातें शतीं । तो एकलाची नवमीं ।।३१।।

**अनुष्टुपात मराठी –**

जे महाभारतीं ज्ञान लाभे गीतेत सर्वते ।
नवमाध्यायिं ते सर्व लाभे एकत्र ते तिथे ।।३१।।

या नवव्या अध्यायात, ज्ञानमूलक कर्मयोग प्रधान अशी नि:स्वार्थी वृत्तीची, संपूर्ण समर्पणयुक्त अनन्यभावाची, ईश्वराबद्दल निर्मळ प्रेम भावाची अशी भक्ती वर्णिली आहे. अशा भक्तीला 'पराभक्ती' अशीही संज्ञा आहे. अशा भक्तीला ज्ञानमूलक म्हटले आहे. अशा पराभक्तीला कोणत्या ज्ञानाच्या पार्श्वभूमीची आवश्यकता असते? गीता म्हणते अशा भक्तीला

वेदाध्यायनाची किंवा कोणत्याही भौतिकज्ञानाची गरज नाही. फक्त ईश्वर, माझा माता पिता स्वामी सर्व काही तोच आहे (पिताऽहमस्य जगत:माता धाता पितामह: । ९/१७/१) इतकेच नव्हे तर तो आत्मरुपात माझ्या ठायीच नित्य वसत असून, माझ्या सर्व बऱ्यावाईट कर्मांचा, इतकेच नव्हे तर मनातील बऱ्यावाईट विचारांचाही तो साक्षी आहे. (उपद्रष्टानुमन्ताच.....अं. १३/२२/१) मी केलेले एखादे दुष्कर्म किंवा ते करण्यामागील माझ्या मनातील वाईट हेतू लौकिक न्यायालयापुढे येण्याचे टळले तरी त्या सर्वसाक्षी ईश्वरापासून ते कधीच लपून राहू शकणार नाहीत; माझ्या सर्व कर्मांची, त्या कर्मांच्या बऱ्यावाईट हेतूप्रमाणे त्या सर्व साक्षीच्या निष्ठूर आणि निस्पृह न्यायकास्थावर प्रत ठरून त्याचे फळ मला मिळणे अगदी अटळ आहे, या गोष्टींची श्रद्धापूर्वक जाणीव असणे हेच ते 'ज्ञान' की ज्याची पार्श्वभूमी या पराभक्तीला अत्यंत आवश्यक असते. याच ज्ञानाचा पुढला 'भाग' म्हणजे जो ईश्वर आपल्या अंतरात आत्मरुपाने वसत आहे तोच ईश्वर सर्व भूतांतही वसत आहे. जे जाणणे व परिणामी सृष्टींतील सर्व चराचरांत भासमान होणे, आणि हे सर्व विश्व त्या ईश्वराचीच कलाकृती आहे, व तो या सर्व विश्वाला व्यापून राहिला आहे याची जाणीव होणे हाच होय. सर्व भूतांत ईश्वर दिसू लागला की मनुष्य आपोआपच निर्वैर होऊन दुसऱ्याच्या हितासाठी झटू लागतो. (म्हणजेच तो गीतेच्या १२ व्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे 'निवैर:सर्वेभूतेषु' आणि 'सर्वभूताहितेरत: असा होतो.)

प्रपंचात वागताना आपल्या वर्णाश्रमाप्रमाणे आपण करीत असलेल्या नोकरी वा पेशाप्रमाणे किंवा परिस्थितीप्रमाणे, चालून आलेल्या कर्तव्यापासून, ते कष्टदायक वा अप्रिय आहे, म्हणून त्यापासून पळून न जाता ते काम जणू आपला खरा स्वामी जो परमेश्वर त्यानेच आज्ञापिले आहे असे समजून, आपली सर्व बलबुद्धी पणाला लावून ते कार्य करणे म्हणजे केवळ ईश्वराचीच सेवा आहे असे मानून, कोणत्याही फळाची आशा न ठेवता ते कर्तव्य, भक्तीने पार पाडणे, हा या पराभक्तींचा दुसरा महत्त्वाचा घटक आहे. म्हणून या परा-भक्तीला 'कर्मयोगप्रधान' असे म्हटले आहे. आणि या प्रमाणे संसारात वागताना, कर्म, कर्मफळ, किंबहुना आपले सर्वस्वच (वैराग्यवृत्तीने) परमेश्वराला अर्पण करून सर्वसमर्पित बुद्धीने ईश्वराला शरण जाऊन त्याच्याच आश्रयी राहणे हा या पराभक्तीचा तिसरा आणि अंतिम घटक आहे.

अशा या पराभक्तीच्या साधनेने परमेश्वराशी अनुसंधान साधले जाते, आणि अगदी सामान्यतला सामान्य माणसासही ते शक्य होऊ शकते. त्यासाठी वेदाध्यायनाची गरज नाही, खडतर तपश्चर्येची गरज नाही, की संसार - संन्यासाची गरज नाही. अशा तऱ्हेने संसारातील कर्मे करून केलेल्या इश्वरपूजेला षोडषोपचारांच्यासारख्या बाह्योपचारांचीही गरज नसते.

संतसखू जनाबाई दळता कांडताच त्या ।
पाळता राजविद्या ही, गेल्या ब्रह्मपदींच त्या ।।११७
'गीता ज्ञान नवनीत'

जरी प्राकृत जे भक्त परी भावें अनन्य जे ।

गोरा-सावता चोखादी ईशप्राप्तीस पावले ।।११९ ।। 'गीता ज्ञान नवनीत'

अशा या राजविद्येची जणू पंचसूत्रीच कृष्णाने गीतेच्या ११ व्या अध्यायाच्या शेवटच्या श्लोकात सांगितली आहे.

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्त: संगवर्जित: ।
निर्वैर: सर्वभूतेषु य: स मामेति पाण्डव ।।५५ ।।

**मराठीत –**

मत्परायण नि:संग भक्त मत्कर्म जो करी ।
निर्वैर सर्व भूती जो मिळे तो मज निश्चयी ।।५५ ।।

अशी स्थिती प्राप्त झाली की भक्ताच्या मुखातून निघालेली हरिनामाची हाक ईश्वराला तत्क्षणीच पोहोचते आणि ईश्वराचे सान्निद्ध्य भक्ताला जाणवू लागते, आणि भय व काळजीपासून तो सर्वथा मुक्त होतो. कारण अशा भक्ताचा योगक्षेत्र मीच चालवतो असे भगवंतानेच ९ व्या अध्यायात म्हटले आहे.

अनन्याश्चिंतयन्तो मां ये जना: पर्युपासते।
तेषां नित्यभियुक्तानां योगक्षेमं वहम्यहम् ।।२२ ।।

**मराठीत –**

अनन्यभावें ध्यानाने मला भक्त उपासनी ।
जे योगी नित्य त्यांचा मी योगक्षेमचि चालवी ।।२२ ।।

याप्रमाणे गीतेने सर्व उपनिषदांचा समन्वय साधून वेदविद्येचे खरे मर्म उलगडून दाखणारे एक अद्भुत रसायनच जनसामान्यांना उपलब्ध करुन दिले आहे. इतकेच नव्हे तर सांख्यदर्शनकार कपिल मुनींचा गौरवाने उल्लेख करून त्याचे काही सिद्धात मान्य करतानाच ज्ञानयोगाला वा कर्मसंन्यास योगाला सांख्य अशी संज्ञा देऊन त्यांचा मान राखला आहे. सांख्य व वेदांत यांतील प्रकृतीबाबतच्या विरोधी मतांचाही समन्वय १५ व्या अध्यायांत साधण्याचा प्रयत्न केला आहे. वर चर्चिलेल्या गीतेच्या अद्भुत वैशिष्ट्यांमुळे वेदविद्येचे खरे मर्म समजून घेण्यासाठी आपल्याला निरनिराळी उपनिषदे किंवा ब्रह्मसूत्रे अभ्यासण्याचे कष्ट घेण्याची काहीच गरज उरत नाही. कारण उपनिषद्रुपी गायींचे दूध एकत्र करून ते घुसळून वर आलेले नवनीतच (नवनीत – प्रियाच्या मुखातून) व्यासांनी आपणास गीतारूपात उपलब्ध करून दिले आहे.

**श्री. प्र.सि. मराठे**
४०२ सन फ्लॉवर, ठक्कर पार्क
वाकोला सांताक्रूज, (पूर्व),
मुंबई – ४०००५५
दूरध्वनी– ०२२-२६६७२२०५

●●●

## क्षमस्व

एप्रिल २०१२ चे अंकात श्री. प्र.सि. मराठे याच्या गीता उपनिषदे (वेदांत) आणि कपिल संख्याशास्त्र या लेखात पान २७ उजवीकडील रकान्यांत ओळ ८ वर द्रोणाचार्यानी असे छापले गेले आहे ते बादरायणचार्यानी असे वाचावे. चूकीबद्दल दिलगीर आहोत. क्षमस्व.

# पुनर्जन्म प्रमेय आणि प्रमाण

कै. ह. ज.दामले

(कै. ह. ज.दामले. यांचा १९९६ साली प्रसिद्ध झालेला लेख.)

ईश्वर आहे की नाही, या विषयावर चर्चा पूर्वापार सुरू आहे. ती कालाप्रमाणे अनादि अनन्त आहे. त्यातच ही एक भर.

पुनर्जन्म– पुन्हा जन्म 'जन्म' 'शब्द मृत्यू' शब्दाशी शाश्वत निगडित आहे. म्हणून गोविंदरावांचा मृत्यू झाल्यावर त्यांना पुन्हा जन्म आहे की नाही, मिळतो किंवा नाही . (मृत्यूनंतर पुन्हा जन्म मिळणे) याचा विचार म्हणजे पुनर्जन्माचा विचार.

कोणतेही प्रमेय सिद्ध करायचे असेल तर त्याकरता चार प्रमाणांची आवश्यकता असते. 'प्रत्यक्षअनुमानोपमान शब्दा: प्रमाणानि ।' 'प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द ही ती चार प्रमाणे. चार्वक केवळ 'प्रत्यक्ष' हे एकच प्रमाण मानतो. बुद्ध प्रत्यक्ष व अनुमान (तर्क) ही दोन प्रमाणे मानतो. शंकराचार्य चारही प्रमाणे मानतात! प्रमेय सिद्ध होण्याकरिता चारही प्रमाणांची आवश्यकता असते असे त्यांचे मत आहे.

प्रत्यक्ष – प्रति+अक्ष म्हणजे डोळ्याना किंवा इंद्रिये. डोळयांना जे दिसते तेच किंवा ''श्रावंचक्षु: स्पर्शनेवचरसनं घ्राणमेवच'' या पाच इंद्रियांनी होणरे ज्ञान तेच खरे ज्ञान. कोणतेही एक ज्ञानेंद्रिय (प्रमाण) प्रमेय सिद्ध करू शकेलच असे नाही. उदाहरणर्थ : पश्यति पित्तोपहत: शशिशुभ्रं शंखमपि पीतम।, कावीळ झालेल्या माणसाच्या डोळयांना चंद्रधवल शंख पिवळा दिसतो. वास्तव पांढरेपणा जाणवतच नाही. त्याचप्रमाणे स्पर्शेंद्रिय, घ्राणेंद्रिय, रसनेंद्रिय, यांची परिस्थिती आहे. तापाने रसनेंद्रिय – जीभ बिघडली असेल तर अमृतमधुर दुधही कडू लागते. अनुमान व उपमान ही वस्तुत: स्वतंत्र प्रमाणे नाहीत. त्याना प्रत्यक्षचा आधार लागतोच. स्वयंपाकघरांतील अग्नी व धूम यांचे सहचर्य पाहिलेला माणुसच पर्वतावरील धूमाने तेथे अग्नी असलाच पाहिजे असे अनुमान करू शकतो. 'गाई सारख पण गाय नव्हे तो गवा' हे ज्याने प्रत्यक्ष गाय पाहिली आहे तोच जाणू शकतो. याचा अर्थ अनुमान(तर्क) व उपमान ही दोन्ही 'प्रमाणे' परावलंबी आहेत. प्रत्यक्षावर अवलंबून आहेत. पंचज्ञानेंद्रिये जर सदोष असतील तर ती प्रमेयाचे वास्तवज्ञान करू शकणार नाहीत.

शास्त्रकारांनी शब्द प्रमाण आवश्यक म्हणून चवथे प्रमाण स्वीकारले.

शब्द प्रमाणम्।

आप्तवाक्यं शब्द:। आप्तस्तु यथार्थ वक्ता।

शब्द हे प्रमाणमूर्धन्य आहे ते मानावेच लगते. शब्द म्हणजे आप्तवाक्य.

आणि आता यथार्थवक्ता. ज्या विषयी बोलावयाचे त्या विषयाचे संपूर्ण आणि वास्तव – खरेखुरे ज्ञान ज्याला असते तो आप्त. आप्तेष्टांपैकी आप्त तो येथे अभिप्रेत नाही. कारण नातेवाईक आप्त आपल्या स्वार्थाकरताच आगदी जवळच्या नातेवाईकांना सुद्धा संपत्तीची, इस्टेटीची वस्तुस्थिती सांगणारे नाहीत. अर्धवट वा विपरीत माहिती देतील.

पंचज्ञानेंद्रियांना आकलन न होणाऱ्या पुनर्जन्माचा विचार करताना शब्द प्रमाण स्वीकरावे लागते. त्या शब्दाशी निगडीत असलेल्या आप्त शब्दाचा अधिक विचार करणे आवश्यक आहे. आप्त शब्द संस्कृत आहे. मिळणे-मिळविणे या अर्थाच्या आप धातुचे रूप आहे. आप्नोत् किंवा आप्तवान् इति आप्त:। ज्याने (ज्ञान) मिळविले आहे तो आप्त. आप्त म्हणजे ज्ञानी, द्रष्टा-त्रिकालदर्शी, भूत, वर्तमान, भविष्यकाळाचे ज्ञान ज्याला झाले आहे. जो त्रैकालिक ज्ञान संपादन करू शकतो तो द्रष्टा. आप्त पुरुष म्हणजे द्रष्टा पुरुष. अशा आप्ताचा शब्द हे प्रमाण.

सामान्यांचे ज्ञान पंचज्ञानेंद्रियजन्य असते. वर्तमानकालापुरतेच मर्यादित असते. शिवाय ते वास्तव असतेच असे नाही, याचा निर्देश पूर्वी केला आहेच.

तर्काने -अनुमानाने भुतकाळाचा मागोवा आणि भविष्याचा वेध घेणे शक्य होईल कदाचित, परंतु त्या तर्काला भूतकालीन प्रत्यक्षाचा, भविष्यकालीन प्रत्यक्षाचा, प्रत्यक्ष ज्ञानाचा आधार तर असणेच शक्य नसल्याने तो तर्क यथार्थवाही असे म्हणता येणार नाही.

द्रष्टया पुरुषांचे ज्ञान अतींद्रिय असते, श्रोत्रादि पंचज्ञानेंद्रियांपेक्षा वेगळया असणाऱ्या एका अतींद्रियाने त्यांना ते प्राप्त होत असते.

अतींद्रिय म्हणजे पंचज्ञानेंद्रियांपेक्षा वेगळे न दिसणारे पण अनुभवाला येणारे म्हणून 'अन्तरिंद्रिय' या नावाने ओळखले जाणारे मन हे ज्ञानचे प्रमुख इंद्रिय आहे. असा उल्लेख विद्यारण्यांनी (पंचदशीकारांनी) केला आहे. द्रष्टया लोकांचे मन निरहंकार, विशुद्ध, त्रिकालदर्शी आणि विश्वाश्लेषी असते. म्हणून त्यांचे ज्ञान मूलग्राही व सर्वांगपरिपूर्ण वस्तुनिष्ठ असते. 'आप्तवाक्यं शब्द:।' यातील आप्त याचा अर्थ द्रष्टा पुरुष असा आहे. अशा आप्तांचा शब्द हे प्रमाण आहे. प्रमेयाचे सर्वांगीण ज्ञान होण्याचे प्रमुख साधन आहे.

पुनर्जन्माचा विचार करताना मनाचा विचार करणे अपरिहार्य म्हणून ज्ञानाचे प्रमुख साधन या दृष्टीने विचार केला. कारण पुनर्जन्म असे म्हणताना मनुष्याचा पुनर्जन्म असे मानले जाते. कृमिकीटक, पशुपक्षी, वृक्षवल्लरी, वनस्पतीवृक्ष यांच्या संबंधात पुनर्जन्म हा शब्द वापरला जात नाही.

मन आहे म्हणून मानव. मन हा मानवतेचा अविभाज्य घटक आहे. मानवेतर प्राण्यांनाही मन आहे, पण ते प्रगत नसते. मानवाचे मन प्रगत आहे. विकसित आहे. प्रगतिशील आहे. विकसनशील आहे. मनाची विकसनशीलता हाच मानव आणि मानवेतर यांच्यात भेद आहे.

आपण पुनर्जन्म म्हणतो तेव्हा मृत झालेल्या मानवाला पुन्हा म्हणजे मेल्यानंतर दुसरा जन्म असा अर्थ अभिप्रेत असतो. त्यात मग अनेक प्रश्न, शंका उत्पन्न होतात. मनुष्य मेल्यानंतर मनुष्याच्यारूपाने येतो कां ? की दुसऱ्या योनीत (जातीत) जन्माला येतो ? या पुनर्जन्माला काही देश-काल मर्यादा आहेत कां? त्या दुसऱ्या जन्माशी पुर्वजन्माचा संबंध असतो कां? असे अनेक प्रश्न उद्भवतात. त्याचा विचार करण्यापूर्वी मेल्यानंतर दुसरा जन्म येणे आणि मेलेला जिवंत होणे यातील भेद स्पष्ट करणे आवश्यक आहे.

मृत्यू नंतर दुसरा जन्म येणे या प्रक्रियेत मृत्यू हा वर्तमानकालीन आहे, तर जन्म मृत्यूनंतर सात ते दहा महिन्यानंतरच्या काळात होत असतो. मृत्यू वर्तमानकाळात तर पुनर्जन्म भविष्यकाळांत अशी स्थिती असते. वर्तमानकाळी मृत्यू पावताना जे लिंग जाती असते तीच भविष्यांतील पुनर्जन्मात असते कां? मृत्यू मुंबईत आला तर पुनर्जन्म मुंबईतच येईल का? कांहीच सांगता येत नाही, येणार नाही. भविष्याच्या उदरात काय आहे, याची निश्चित कल्पनाही कोणी करू शकणार नाही. काळाचीही तीच अवस्था असते. मृत्यूच्यावेळच्या वेळचा वर्तमानकाळ पुनर्जन्माच्यावेळी भूतकाळ झालेला असतो आणि मृत्यूच्यावेळी वाटणारा भविष्यकाळ जन्माच्यावेळी वर्तमानकाळ झालेला असतो.

महान पराक्रमी भीष्माचार्यांची मागील जन्मात असलेली पत्नी शिखण्डी नावच्या महारथ्याच्या रूपाने जन्मास आली होती. आणि या गोष्टीचे ज्ञान भीष्मांना या जन्मातही होते. या दोन्ही घटना (महाभारतातील) पुनर्जन्माचा विचार विचार करताना लक्षात ठेवणे आवश्यक आहे. व्यवहारात पुनर्जन्म शब्द वेगळया संदर्भात वापरला जातो. आसन्नमरण परिस्थितीत असलेला रुग्ण जेव्हा बरा होतो. हिंडूफिरू लागतो, व्यवहार करू लागतो तेव्हा आपण म्हणतो की, याचा पुनर्जन्म झाला. वस्तुत: येथे त्या व्यक्तिचा मृत्यू घडलेला नसतो. भविष्यकाळाचाही संबंध नसतो. 'वर्तमानसमीपेवर्तमानवद्रा' 'वर्तमानकाळाच्या अगदी जवळचा भूतकाळ वा भविष्यकाळ वर्तमानकाळाप्रमाणेच समजावे. कारण काळ अत्यंत गतिमान आहे भूत-वर्तमान. भविष्य हे एकमेकाला बिलगलेले असतात. आपण केशव शब्द उच्चारतो तेव्हा वर्तमानकाळात असलेले यके 'अक्षर उच्चारताच 'श' अक्षर भविष्यांत असते, ते 'श' अक्षर उच्चारताना वर्तमानकालीन 'के' अक्षर भूतकाळात जाते आणि भविष्यातील 'व' अक्षर उच्चारताना 'के' व 'श' दोन्हीही भूतकालीन ठरतात. डोळयाचे पाते लवते न लवते तोच तेवढयाकाळात काळाची वर्तमान भूत आणि भविष्य अशी स्थित्यंतरे घडत असतात. व्यवहारात सोयीकरता काल रात्रीच्या बारा वाजल्यापासून आज रात्रीच्या बारा वाजे पर्यंतचा काळ वर्तमानकाळ, त्यापूर्वीचा भूतकाळ आणि नतरचा भविष्यकाळ समजतो आणि त्यालअनूसरून काल, आज आणि उद्या असे त्याचे वर्गीकरण करीत असतो.म्हणून एखदी व्यक्ति मरण पावली असे आपणास वाटते तर दोन- चार-सहा- आठ तासांनी ती व्यक्ति सजीव झाली त्या प्रक्रियेला पुनर्जन्म म्हणता येणार नाही. कारण मृत्यू (भासलेला) आणि पुनर्जीवन वर्तमानकाळातच घडलेले असते. शिवाय शरीर तेच असते. ख-या मृत्यूनंतर येणा-या जन्मात रूप-रंग-गुण पूर्वीचेच असले तरी शरीर मात्र तेच कधीच नसते.

मुसलमान पुनर्जन्म मानीत नाहीत. न मानोत. कोणाच्या मानण्या न मानण्यावर वस्तुस्थिती अवलंबून नसते.

ख्रिश्चन लोक पुनर्जन्म मानतात. पण येशूचे पुनरुथान झाले त्याला पुनर्जन्म म्हणतात. मागे दर्शविल्या प्रमाणे लौकिक अर्थाने बरोबर आहे. परंतु वास्तव शास्त्रीय अर्थाने बरोबर नाही. येशू मृत झाला नव्हता, मृतप्राय झाला होता. सुळावर

चढविल्यावर तो मरण पावला असे मानून परत निघून गेले. नंतर त्याच्या भक्तांनी त्याला सुळावरून त्याला उतरविल्यानंतर तो सजीव झाला. (काही उपचर केले असणार) पुन्हा सजीव होणे म्हणजे पुनर्जन्म नव्हे. पुनर्जन्मात पुनर्जन्मीचे शरीर प्राप्त होत नाही. कारण ते जाळून, वा पुरून किंवा जलसमाधी देऊन नष्ट करण्यांत आलेले असते. येशूचे शरीर तेच होते. म्हणून येशूचा पुनर्जन्म झाला हे वास्तव नव्हे. पुनरुथान झाले असे म्हटले पाहिजे.

धर्मराजाच्या राज्याभिषेकाच्या वेळी अग्रपूजा कृष्णाची करावी असे ठरताच 'माझ्या सारखे क्षत्रिय कुलावतंस राजे उपस्थित असता एका गवळयाच्या पोराची पूजा करणे हा आम्हां सर्व महान क्षत्रियांचा अपमान आहे; आम्ही तो सहन करणार नाही,' असे अपमानकारक शब्द ऐकताच श्रीकृष्णाने सुदर्शन चक्राने शिशुपालाचा वध केला होता. त्याचा सूड उगवण्याकरता शिशुपाल अभिमन्युच्या (सुभद्रेच्या पुत्राच्या) रूपाने जन्मास आला होता. याचा अर्थ अभिमन्युच्या रूपाने (शिशुपालाच्या रूपाने नव्हे). शिशुपालाचा पुनर्जन्म झाला होता. ही पौराणिक कथा प्रसिद्ध आहे.

मृत व्यक्ति जिवंत झाल्या, जिवंत केल्या. अशा अर्थाच्या कथा पौराणिक वाङ्मयात, संत वाङ्मयात साधुसंतांच्या चरित्रात पुष्कळ आहेत.

पुराणातील सत्यवानाची कथा सर्वविदित आहे. सत्यवान त्या कथेच्या रूपाने चिरंजीवच झाला आहे. दाहसंस्काराकरिता स्मशानात नेले जाणारे प्रेत मधेच किंवा चितेवर ठेवण्याच्यावेळी जिवंत झाल्याच्या गोष्टी पूर्वी प्रत्यक्षात घडल्या होत्या व सध्याही मधूनमधून ऐकू येतात. मुल मृत झाले आहे या खात्रीने परिचारिकेने बाजूला ठेवल्यानंतर जिवंत झाल्यचे (असल्याचे) अढळून आले, अशा घटना रुग्णालयात आजही घडत असल्याचे मधूनमधून वृत्तपत्रातून वाचावयास मिळते. बंगालमधील एक मोठा जमीनदार मरण पावला. (अशी लोकांची निश्चित समजूत) स्मशानात नेऊन त्याला चितेवर ठेवले अग्नी देणार तोच प्रचंड वादळ झाले. मुसळधार पाऊस पडू लागला. त्यामुळे त्या जमीनदाराला पोचवायला गेलेले सर्व लोक चितेला अग्नी देण्यापूर्वीच तेथून पळाले. घरोघरी निघून गेले. जमीनदाराचे प्रेत चितेवर वादळवारा सहन करीत पडून होते.

योगायोगाने त्याच वेळी तिकडून जाणाऱ्या काही बैराग्याना चितेवरील प्रेत हालचाल करत आहे, सचेतन आहे (वा-याने अगर पावसाने, कदाचित दोहोमुळेही असेल, ते प्रेत पुन्हा सजीव झाले असेल किंवा त्यावेळी कांही लोक म्हणत त्याप्रमाणे बैराग्यांनी मंत्रतंत्राने ते सजीव केले असेल) असे आढळले. त्यांनी चेतनावस्थेत असलेल्या जमीनदारास मठात नेले कांही काळानंतर त्या जमीनदाराच्या पूर्वस्मृती जागृत झाल्या आणि तो आपल्या घरी परत आला. त्यानंतर हे पिशाच्च तर नाही ना? इस्टेटीच्या लोभाने हा तोतया तर आला नाही ना, अशा शंकाकुशंका निर्माण झाल्या. शेवटी ते प्रकरण कोर्टात गेले तो खटला भोवाली खटला म्हणून भारतभर गाजला. शेवटी ते भूतही नाही आणि तोतयाही नाही असे न्यायालयात ठरले.

अगदी अलीकडील प्रत्यक्ष अनुभवलेली

एक गोष्ट आहे. हार्टअटॅक आल्यामुळे रुग्णलयात आणलेला रुग्ण थोडयाच वेळांत बेशुद्ध झाला. श्वसनक्रिया आणि हृदयक्रियाही बंद झाली डॉक्टरांनी पेशंट डेड म्हणून जाहीर केले. मंडळी जमली. हळु आवाजात रडारड झाली (हॉस्पिटलात धायमोकलून रडण्यास बंदी आहे.)

या गडबडीत तासभर निघून गेला आणि अद्‌भुत घडले. रुग्णाने डोळे उघडले. भोवतालच्या आप्तेष्टांचे पाणावलेले डोळे पाहून त्याने हाताची प्रश्नार्थक हालचाल केली . धावपळ झाली. परिचारिका जमल्या. डॉक्टर आले. सर्वांगीण चाचणी-तपासणी झाली. हृदयाची स्पंदने, नाडीचे ठोके, सर्व शरीराची संवेदना यथापूर्व. सर्व काही ठीक, जीवनप्रवाह पुन्हा सुरू झाला आहे असे डॉक्टर म्हणाले.

असे घडते कधी कधी, म्हणून मृत्यू पावल्यावर निदान दोन तास तरी 'मृत' असा दाखला डॉक्टर देत नाहीत.

या वरून स्पष्ट होते की, याच काळी, याच देही, याचि डोळयांनी काही काळानंतर पुन्हा चैतन्य कार्यप्रवण होणे याला पुनरुत्थान म्हणावयाचे, पुनर्जन्म म्हणता येणार नाही. येशूचे पुनरुथान होते, पुनर्जन्म नव्हता. जर पुनर्जन्म असेल, तर गेल्या जन्मी कोण होता याची माहिती नाही. मेरीला कुमारी अवस्थेत झालेला पुत्र येवढीच माहिती येशूबद्दल सांगण्यात येते. अरंभी प्रमेय सिद्धी करता ज्या प्रमाणांची आवश्यकता ती प्रमाणे कोणती याचा विचार केला. नंतर पुनर्जन्म शब्दाचा विचार केला, नंतर पुनर्जन्म व पुनरुत्थान याचा विचार केला, आता मृत्यू झाला म्हणजे नेमके काय झाले यासंबंधी सामान्य लोकांच्या काय कल्पना आहेत याचा विचार करणे योग्य ठरेल.

श्वासोच्छ्‌वास संपूर्णपणे थांबला, नाडीची हालचाल थांबली, ठोके, हृदयाची स्पंदने थांबली, डोळयासह सर्व शरीर स्तब्ध झाले म्हणजे मृत्यू झाला, ती व्यक्ति मरण पावली असे सर्वसामान्य माणसे मानतात. त्याचा प्राण गेला असे म्हणतात. वस्तुत: प्राण पांच आहेत - ते वायुरूप आहेत.

प्राणोऽपान समानश्चो दानव्यानाश्चवायव: या प्राणरूप वायूंची शरीरातील स्थानपरत्वे प्राण, अपान,समान, उदान, आणि व्यान अशी पांच नावे आहेत. प्राणाचे - हृदय, आपानाचे गुदद्वार, समानाचे नाभी, उदानाचे कंठ, आणि व्यानाचे सर्व शरीर स्थान आहे. असे हे 'पंचप्राण' निघून गेले म्हणजे मृत्यू आला असे मानतो. त्याबद्दल, पंचत्वात विलीन झाले स्वर्गवासी, इत्यादी अनेक शब्द वापरले जातात.

या संदर्भात साहित्यसम्राट तात्यासाहेबांनी (न. चिं. केळकर) मृत्यूच्यापूर्वी कांही क्षण - शय्ये वरून उठून नेहमीच्या लिहिण्याच्या टेबलापाशी जाऊन खुर्चीवर बसून चार ओळीची एक कविता एका कागदावर लिहिली. तो कागद टेबलावर ठेवून त्यावर पेपरवेट ठेवला. आणि परत शय्येवर गेले. कांही मिनिटाांत ते झोपी गेले ते कायमचेच. त्या स्वकृत कवितेचा आशय असा होता.

'आजवर ज्यांनी ज्यांनी मला हरप्रकाचे साहाय्य दिले त्यांचा मी यथाशक्ती उतराई झालो आहे. त्यांच्या ऋणातून मी मुक्त झालो आहे. आता ज्या पृथिव्यादी पंचमहाभूतांनी मला हा

देह दिला त्यांच्या ऋणातून मला मुक्त व्हावयाचे आहे. म्हणून माझा हा देह त्यांना अर्पण करणे हा एकच त्या ऋणाच्या मुक्तीचा मार्ग आहे. मी माझा देह आज त्यांना अर्पण करीत आहे.'

ऋणमुक्तीच्या अलौकिक आनंदची सांगड मृत्यूशी बांधण्याची कल्पना किती उदार, रमणीय आणि सुखद आहे! मृत्यूला आनंदाने, कृतकृत्येने सामोरे जाण्याची तात्यासाहेबांची कल्पना - भावना भव्योदत्त होती-आहे यात शंकाच नाही.

यात ऋणमुक्ती कृतज्ञता आणि पुनर्जन्माच्या अस्तित्वाची दृढभावाना सुचित केली जाते. या जन्मी कर्ज काढून फेडले नाही तर पुढील जन्मी ते कर्ज कष्टाने दामदुप्पट व्याजाने फेडावे लागते, ते ऋणमुक्त झाल्यानंतर फेडावे लागणार नाही. या जाणीवेने मोठा आनंद होतो. ऋणातून मुक्त झाल्याचे समाधान लाभते.

प्रस्तुताला उपयुक्त पण थोडे विषयांतर झाले. आता पुनर्जन्म आहे हे प्रमाणांनी सिद्ध करावयाचे आहे. पुनर्जन्म हा भविष्यकालीन असल्यामुळे वर्तमानात प्रत्यक्ष प्रमाण उपयुक्त, प्रत्ययकारी होणार नाही. कारण भविष्याकाळ (वर्तमान व भूतही) अमूर्त अतएव अदृश्य आहे. म्हणून नेत्रादी पंचज्ञानेंद्रियांना त्याचे व त्यात घडणाऱ्या घटनांचे ज्ञान होणार नाही. अनुमान व उपमान ही प्रमाणे पत्यक्षावरच आधारित असल्यामुळे तीही भविष्यकाळ व त्यातील घटनांचे वास्तव ज्ञान करून देऊ शकणार नाहीत. अशा स्थितीत पुनर्जन्माच्या बाबतीत 'प्रभा' (वास्तव-सर्वागीण खरे ज्ञान) करून देण्याचे प्रमाण शब्द हेच शिल्लक राहते. (प्रमाण वास्तव ज्ञान करून देते ते प्रमाण अशी प्रमाण शब्दाची शास्त्रीय व्युत्पत्ती-व्याख्या आहे.) प्रमाणभूत शब्दाची व्याख्या आरंभी दिली आहे. (आप्त वाक्यं शब्द:। आप्तस्तु यथार्थ वक्ता)

फार प्राचीन काळी प्रदीर्घकाळ देहाचे सुद्धा भान विसरून तपस्या करणाऱ्या ऋषी महर्षींच्या तोंडून जे ध्वनी प्रगट झाले ते अक्षरांच्या - शब्दांच्या वाक्यांच्या रूपाने वेद साकार झाले.

पूर्वार्ध...
उत्तरार्ध पुढील अंकात देत आहोत.

**कै. ह. ज. दामले**

●●●

**शिवमहिम्न स्तोत्र**

सद्धर्मच्या वाचकांना आठवत असेल की काही दिवसापूर्वी मासिकातून श्लोकांचे विवरण देता आले नाही.

आता बदलापूर येथील श्री. ब्रह्मचैतन्याश्रम याचे संचालक श्री. सुहास समुद्र यांनी हे पुस्तक प्रकाशित केले आहे. पुस्तकात श्लोकातील संधी, सर्व शब्दांचे व्याकरण, समास, अर्थ वृत्त इत्यादी माहिती दिली आहे. या शिवाय शिवमानस पूजेचा अर्थ दिला आहे. पुस्तकाची पाने १४० असून किंमत १५० रु आहे. परंतु हे पुस्तक सद्धर्मच्या वाचकास सवलतीच्या दरात खालील पत्त्यावर मिळू शकेल. इच्छुकानी आवश्य लाभ घ्यावा.

पत्ता - श्री ब्रह्मचैतन्याश्रम, समर्थनगर शिरगाव, आपटेवाडी, कुळगाव (पूर्व) बदलापूर जि. ठाणे

# कपिल मुनींचा मातेला उपदेश (लेखांक ४)

श्री. शं. बा . मठ

**श्लोक २९**

**यो योगो भगवद्‌बाणो**
**निर्वाणात्मंस्त्वयोदित: ।**
**कीदृश: कतिचांगानि यतस्तत्वावबोधनम् ।**

तू जो गूढ असा योग मला सांगितलास तो भगवंताच्या सान्निध्यात जाण्याचाच आहे. भौतिक जीवनापासून संपूर्णतया सुटका करुन घेता येते. ह्या योगपद्धतीची सविस्तर माहिती करून दे. त्याचे किती प्रकार संभवतात. विविध पद्धतीच्या योगामुळे त्या प्रकारचे अनुभव ही संभवतात. जीवमात्राला सत्य ज्ञान होऊ शकेल असा योग कोणता?

योगाचे विविध प्रकार संभवतात व तसे अनुभवही प्राप्त होतात. पूर्ण सत्य ज्ञानासाठी देखील यांचा उपयोग होऊ शकतो. भगवंताला जाणणे, त्याच्याशी आपले नाते ओळखणे तसेच त्या नात्याप्रमाणे भगवंताशी व्यवहार करणे असे झाल्यासच जीवात्मा उन्नत होईल. आध्यात्मिक ज्ञानाचा शोध घेताना त्या गोष्टीशी आपण समरस होत नसू तर पोकळ शब्द ज्ञानाने काही साधणार नाही. भौतिक जीवनातच पुन:माघारी फिरु.

भक्ती ही सहज घडली पाहिजे. त्यात उत्स्फूर्तपणा असला पाहिजे. कृत्रिमता उपयोगाची नाही.

**श्लोक ३०**

**तत् एतन्मे विजानीहि यथाऽहं मंदधीर्हरे ।**
**सुखं बुद्धेय दुर्बोधं योषा भवत् अनुग्रहात् ।**

बाळ कपिला मी एक स्त्री आहे. मला तुझा दुर्बोध उपदेश पचनी पडत नाही . मला सत्याचे ज्ञान सुलभतेने करून दे. मी इतकी शहाणी नाही. तू मला समजण्यासारखे सांग तरच मला आकलन होऊ शकेल. तरच मी आत्यंतिक आनंदाचा आस्वाद घेऊ शकेन.

अंतिम सत्याचा बोध होणे इतके सोपे नाही. सामान्य बुद्धीच्या लोकाना हे समजणे दुरापास्तच. आध्यात्मिक गुरु दयावंत होऊन सामान्य बुद्धीलाही उमज पडेल असे विवरण करील तरच त्याना बोध होऊ शकेल. भगवत् कृपेने आध्यात्मिक ज्ञान समजणे शक्य होईल. कपिल देवाच्या दया बुद्धीमुळे माता देवहूतीला हे शक्य झाले व अंतिम सत्याचा तिला बोध होऊ शकला. हा विषय सर्व सामान्याना समजणे कठीणच.

**श्लोक ३१**

**मैत्रेय उवाच विदित्वार्थं कपिलो मातु: इत्थं**
**जात स्नेहो यत्र तन्वाभिजात: ।**
**तत्वान्मायं यत् प्रवदन्ति सांख्यं प्रोवाच वै**
**भक्ति विज्ञान योग्यम् ।**

मैयेय म्हणाला – आपल्या मातेचे अशा प्रकारचे बोलणे ऐकून कपिलाला आपल्या आईची अडचण ध्यानात आली. तिच्या उदरी आपला जन्म झाला हे ध्यानात घेऊन परम कारुणिकतेने त्यानी तिला सांख्य योग तत्वज्ञानाचा बोध केला. ते तत्त्वज्ञान भक्ती व साक्षात्कार आदीने युक्त असून शिष्याला समजाऊन देण्यास सोपे आहे.

कपिल मुनीनी रचना केलेले सांख्यदर्शन निरीश्वरवादी आणि विश्वाच्या घडणीबद्दलचा तर्क शुद्ध विचार त्यात मांडलेला आहे. हे दर्शन पाश्चात्यानाही अवगत आहे. मात्र सांख्ययोग भक्ती प्रधान आहे. अंतिम सत्य जाणण्यासाठी हा उत्तम उपाय असल्याचे सांगितले आहे. सर्व योगात भक्तियोग हा योग शिरोमणि आहे. संक्षेपत: कर्मयोग, ज्ञानयोग, ध्यानयोग, सरते शेवटी भक्तीयोग. या भक्तियोगाच्याद्वारे संपूर्णतया ईश्वरी ज्ञान होते म्हणून त्याला पूर्ण योग म्हटले आहे.

**श्लोक ३२**

**श्री भगवान उवाच – देवानां गुणलिंगानां अनुश्राविक कर्मणाम् ।**
**सत्य एवैक मनसोवृत्ति: स्वाभाविकी तु या ।**

भगवान म्हणाले – इंद्रिये ही उपदेवतांचे प्रतिनिधित्व करतात आणि साधारणपणे वेद वचनानुसार वर्तन करण्याचा त्यांचा कल असतो. उपदेवता इंद्रियांचे प्रवर्तन करतात. त्याप्रमाणे मन हे भगवंताचे प्रतिनिधित्व करते. मनाचे कर्तव्य भगवंताच्या सेवेत स्वत:ला गोवणे व त्याची भक्ती करणे हे आहे. हे करताना निर्हेतुक सेवा घडल्यास ती मुक्तीहून ही श्रेष्ठ ठरते.

साधारणपणे इंद्रियांचा कल वेदानुसार वर्तन करणे वा भौतिकतेत रममाण होणे. इंद्रिये स्वभावत: कोणत्यातरी गोष्टीशी निगडित राहून व्यवहार करतात. मन हा इंद्रियांचा राजा आहे, वास्तविक मन इंद्रियांचा नेता आहे. हा सत्व गुणाचा प्रभाव आहे.

कपिल म्हणाला भक्तीत इंद्रिये स्वार्थ विरहित, हेतु विरहित भगवंताच्या सेवाकार्यात सहकार्य करतात. भगवत् सेवा घडली असता त्या योगे भावातीत स्थिती प्राप्त होऊन मुक्तीपेक्षा ही अधिक अशा भगवत् सान्निध्याचा लाभ होतो.

**श्लोक ३३**

**अनिमित्ता भागवती भक्ति: सिद्धे:गरीयसी ।**
**जरयति आशु या कोशं निगीर्णं अनलोयथा ।**

भक्ती देहबुद्धी कमी करते त्यासाठी वेगळा प्रयत्न करावा लागत नाही. खाल्लेले सर्व पदार्थ जठराग्नी पचवितो त्याप्रमाणे भक्ती कार्य करते. मुक्तिपेक्षा भक्ति कितीतरी पट श्रेष्ठ आहे. भक्तीने लौकिक जीवनाविषयीचे आकर्षण आपोआप नाहीसे होते.

पचन शक्ती असल्यास पचन आपोआप घडते, त्याचप्रमाणे भक्ताला मुक्ततेसाठी वेगळा विचार करण्याची आवश्यकताच राहात नाही. भगवंताच्या भक्तीतच ही गोष्ट आपोआप घडते. भगवंताच्या भक्तीत स्वत:ला गुंतविण्याने भौतिकतेचा आपोआप लोप होत जातो.

**श्लोक ३४**

**नैकात्मतां मे स्पृहयन्तिकेचित् । मत् पाद सेवाभिरता मदीहा: ।**
**येऽन्योन्यतो भागवता: प्रसज्य । समाजयन्ते मम पौरुषाणि ।**

शुद्ध वृत्तीचा भक्त भगवत् सेवेत मग्न असतो व त्याचे मन भगवंताच्या चरण कमळाच्या ठिकाणी लीन होते. असा भक्त भगवंताशी एकरुप

होण्याची कधीच इच्छा करत नाही. मात्र क्षणभर ही त्याचे चित्त विलग न होता माझ्या महात्म्याचे व माझ्या पुरुषार्थाचे गौरव करण्यात मग्न असते.

पांच प्रकार मुक्तीचे संभवतात. परमात्म्याशी एकरुप होणे हा पहिला प्रकार. स्वत:ला विसरुन जाणे भगवत् चिंतनात निरंतर राहाणे यालाच एकात्मता म्हणतात, सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता व एकात्मता हा पांचवा प्रकार.कपिल मुनि स्पष्ट करतात की भक्ती मुक्तीपेक्षाही पलीकडची आहे . यालाच पांचवा पुरुषार्थ असेही म्हणातात.

**श्लोक ३५**

**पश्यंति ते मे रुचिराणि अम्ब सन्त: प्रसन्नवक्त्रारुण लोचनानि ।**
**रूपाणि दिव्यानि वर प्रदानी साकं वाचं स्पृहणीयो वदन्ति ।**

माते, भक्त नित्य माझे (भगवंताचे) सुहास्य मुखावलोकन करतात. उगवत्या अरुणोदय सूर्यासारखे माझे मुख डोळ्यानी पाहातात. ते त्याना कल्याणकारक वाटते व माझ्या विषयी नित्य संवाद करतात.

लौकिक जगातील वस्तूवरच आकर्षित झालेला जीव थोड्या फार फरकाने राक्षसीवृत्तीचा असतो. तो भगवंताला मानत नाही. वास्तविक जीवाने प्रत्येक क्षण भगवत् चिंतनात घालवावे, कल्याण करुन घ्यावे.

**श्लोक ३६**

**तै दर्शनीयावयवैरुदार विलास हासे क्षित वाम सूक्तै: ।**
**हृतात्मनो हृत प्राणांच भक्ति: अनिच्छतो मे गतिमण्वीं प्रयुंक्ते ।**

भगवंताचे ते विलोभनीय रुप, त्याचे ते हास्य, ती ओढ, ते रोचक शब्द, या साऱ्याने खराभक्त उल्हासित होतो. त्याला देहाचे भान राहात नाही. त्याची इंद्रिये सर्व भौतिकते पासून मुक्त होतात व फक्त भगवंताच्या सेवेतच तत्पर होतात. त्या भक्ताची इच्छा नसतानाही तो मुक्त होतो. तो त्यासाठी कसलाच प्रयत्न करीत नाही.

भक्ताचे तीन प्रकार संभवतात. परमभक्त, गौण भक्त, साधा भक्त तो देखील मुक्त आत्मा असतो. देवळातील मूर्तीचे सौंदर्य पाहताच काही भक्त भगवंताशी एकरूप होतात. काही वेळा त्यांचे देहभान हे देखील हारपते. त्याला केव्हातरी याची जाण येताच ती भगवंताची लीला असल्याचे त्याला वाटते.

**श्लोक ३७**

**अथो विभूतिं मम मायाविनस्ताम् ऐश्वर्यं अष्टांगं अनुप्रवृत्तम् ।**
**श्रियं भागवतीं वा स्पृहयन्ति भद्रांपरस्य ते श्रुवते तु लोके ।**

असा भक्त संपूर्णतया भगवंताच्या ध्यानात मग्न होऊन जात असल्याने सर्व कल्याणकारी उच्च थरातील सत्य लोकाचाही विचार करत नाही. अष्टसिद्धिची त्याला आवश्यकता वाटत नाही. उन्नत व्हावे असेही वाटत नाही. या गोष्टींची इच्छा न करताही याच जीवनात तो कल्याणकारी जीवन जगत असतो.

या जगतातील भौतिक गोष्टीने प्राप्त होणारे विविध प्रकारचे सुख आपण अनुभवतो. कदाचित याहून वरच्या स्तरावरील लोकात राहाण्याचा योग आल्यास तिथेही भौतिक सुखाचा आस्वाद घेण्याची इच्छा करतो. फक्त भक्त मात्र एकान्त भाव इच्छितो व भगवंताची एकाग्रतेने सेवा करतो. यातूनच त्याला सर्व प्रकारची सुखे प्राप्त होतात.

**श्लोक ३८**

**न कर्हिचित् मत्पर: शांतरुपे नक्ष्यन्ति नो मे निमिषो लेढि हेति: ।**
**योषां अहं प्रियमात्मा सुतश्च सखा गुरु: सुहृदो दैव मिष्टम् ।**

भगवान म्हणतात – माते ज्याला ही भावातीत श्रेष्ठ अवस्था प्राप्त होते तो कधीही त्या अवस्थेपासून ढळत नाही. शस्त्राने अगर बदलत्या परिस्थितीनेही ही श्रेष्ठता त्याला सोडत नाही. कारण हा भक्त मला मित्र, बंधु, पुत्र, गुरु, कल्याण करणारा, सर्वश्रेष्ठ दैवत मानतो. त्याला माझ्यापासून कोणतीही शक्ती अलग करू शकत नाही.

गीता सांगते – एखादा ब्रह्मलोकापर्यंत जाईल आपल्या शुद्ध आचरणाने त्याला जाताही येईल. मात्र ज्याक्षणी ते पावित्र्य संपुष्टात येईल, त्याचक्षणी तो पृथ्वीतलावर पुनश्च येईल. पुन: दुसरा जन्म घेईल, व त्या काळानुरुप त्याचे व्यवहार सुरु होतील.

आध्यात्मिक जीवन हे चिरंतन असते. त्या जीवनाचा कधी नाश होत नाही. मात्र भौतिक जगातील सर्व काही कालांतराने नाश पावते. या जगातील विपुल संपत्ति, उत्तम निवास, पुत्रपौत्रादि परिवार, मित्र आदि या सर्वांचा केव्हातरी नाश होतो. किंबहुना स्वत:चाही नाश होतो. या भूलोकी कोणतीही वस्तु शाश्वत नाही. सारे काही प्रासंगिक. हे समजून घेतले पाहिजे. उलट आपण हे सारे चिरंतन आहे असेच गृहीत धरतो.

**श्लोक ३९ व ४०**

**इमं लोकं तथैवाभं अमुं आत्मानं उभयायिनम् ।**
**आत्मानं अनु ये चेह ये राय: पशवो गृहा: ।**
**विसृज्य सर्वान् अन्यांश्च मामेवं विश्वतोमुखम् ।**
**भजन्ति अनन्यया भक्त्या तान् मृत्यो अतिपारये ।**

जगाला सारे काही देणारा जोगी, माझा भक्त, निरलसपणे माझ्याशी वर्तन करतो, सर्व मोठेपणाच्या विचाराबद्दल तो पराङमुख असतो, स्वर्ग वा अन्य कशाची तो इच्छा बाळगत नाही हा भक्त जन्ममृत्यू पासून माझ्या कृपेने मुक्त होतो.

वरील दोन श्लोकातून निरलस सेवेचा विचार मांडलेला आहे. भक्त केवळ भगवंताचे स्मरण करतो, भगवंतच सारे काही आहे अशी त्याची श्रद्धा असते. खरा भक्त मुक्तीसाठी देवाला कधीच आळवत नाही. तसेच या भवसागरातून कधी बरे सुटका होईल असा विचार ही करत नाही. वास्तविक हा भक्त मुक्त होण्यास मी लायक नाही असेच मानतो. आपली पूर्व संचित कर्मे या जन्मातील नित्य होणारे प्रमाद यामुळे मी नरकात जाण्यासच योग्य आहे असा स्वत:शी विचार करतो.

**श्लोक ४१**

**नान्यत्र मद् भगवत: प्रधान पुरुषेश्वरात् ।**
**आत्मन: सर्व भूतानां भयं तीव्रं निवर्तते ।**

जन्म मरणाच्या भयापासून कोणी सुटलेला नाही. फक्त मला जो शरण आला तो मात्र सुटका करून घेतो. मी सर्वजगाचा निर्माता, सर्व समर्थ भगवान आहे. मीच ही सृष्टी निर्माण करतो. सर्व जीवांचे मीच आश्रय स्थान आहे.

इथे हे स्पष्ट करण्यात आले आहे की, जन्ममरण संसार चक्रातून कोणी सुटलेला नाही. मात्र ईश्वराचा अनन्य भक्त यातून सुटका करुन घेतो. भगवंताच्या कृपेवाचून कोणाचीही सुटका होणे अशक्य. मुक्तीसाठी भगवंतालाच शरण गेल्यावाचून गत्यंतर नाही. जो केवळ इंद्रिय सुरवातच मग्न आहे त्याची या भौतिकतेतून कधीच सुटका होणार नाही.

**श्लोक ४२**

**मद्भयात् वाति वात: अयं सूर्य: तपति मद्भयात्।**
**वर्षति इन्द्र: दहतिअग्नि: मृत्युचरति मद्भयात् ।**

माझ्या धाकाने वारा वाहातो, सूर्य प्रकाशतो इन्द्रपर्जन्याचा वर्षाव करतो अग्नी जाळतो, मृत्यू संहार करतो.

**श्रीकृष्णगीतेत म्हणतात–**

नैसर्गिक नियम माझ्या प्रभावामुळे पाळले जातात. निसर्ग आपोआप प्रवर्तित होत नाही. भगवान त्यांचे नियमन करतो त्याच्या धाकाने हे सारे सुरळीतपणे वागतात. निसर्ग जड आहे. त्याला प्रवर्तक असल्या खेरीज तो कार्य करू शकत नाही.

**श्लोक ४३**

**ज्ञान वैराग्य युक्तेन भक्तियुक्तेन योगिन: ।**
**क्षेमाय पादमूलं मे प्रविशन्ति अकुतोभयम् ।**

योगी ज्ञान वैराग्य व भक्ती या द्वारे शाश्वत कल्याणाला प्राप्त होतो. माझ्या चरणकमळाच्या आश्रयाने तो राहातो. माझ्यात नि:शंक मनाने तो प्रवेश करतो.

भक्ती ही सर्वात श्रेष्ठ साधना आहे. लौकिकात सर्व गोष्टीसाठी संघर्षच करावा लागतो.

हे करताना आपल्या जीवनाची समाप्ती होते व पुन जन्म घेऊन याच लोकी व्यवहार करावा लागतो. ज्ञान म्हणजे बोध. भगवंताशी आपले कोणते नाते आहे व त्या नात्याप्रमाणे आपले वर्तन होते का हे पाहाणे हे आपले कर्तव्य ठरते. लौकिक गोष्टी पासून स्वत:ला अलग ठेवण्यास आपले मन नेहमीच कच खाते. भक्ति योगाने वैराग्य प्राप्त होऊन भगवंताला शरण जाण्याची बुद्धी होते.

**श्लोक ४४**

**एतावान् एव लोकेऽस्मिन् पुंसां निश्रयसोदय: ।**
**तीव्रेण भक्ति योगिन मनो मयि अर्पितं स्थिरम् ।**

भगवंताच्या भक्तीत ज्याचे मन भारून गेले आहे, भगवंताशी समरस झाले आहे त्यालाच भगवंताचे सान्निध्य प्राप्त होते. तेच खरे आपल्या

जीवनाचे ध्येय असावे. 'मनो मयिअर्पित' ज्ञान व वैराग्य यानी युक्त जीवनच भक्ती योगाला पात्र होते.

अशा प्रकारे कपिल मुनीनी आपल्या मातेला (देवहूति) ज्ञान करून दिले. हा त्यांचा उपदेश अनेक साधक भक्ताना उपयुक्त ठरणारा आहे. भक्तांनी जिज्ञासे पोटी नारदभक्ति सूक्ते पण अभ्यासावीत. साधना योग्य रीतीने करण्यास मदत होईल.

कपिलमुनीनी उपदेशलेल्या ग्रंथातील भागवतपुराण खंड ३ अध्याय २५ यातील भक्तिविषयक निरूपण इथे समाप्त झाले.

इति शम्।

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

•••

## मनोनिवृत्ति...

कोट्याधीशापासून भिकाऱ्यापर्यंत सर्वजण शान्ततेची, शांततामय जीवनाची अपेक्षा करीत असतात. पण गंमत अशी कीं आपल्या शान्ततेकरतां दुसरीकडे अशान्तता निर्माण करीत असतात. एकीकडे शांति भंग पावली तर तिचे दुष्परिणाम दुसरीकडे उमटतात. कारण ते शांततेचे प्रयत्न व्यक्तिनिष्ठ असतात.

## व्याधि आणि शत्रु...

*जातमात्रं तु व्याधिं शत्रुंवा प्रशमं नयेत।*
*अतिपुष्टांगयुक्तोऽपि सपश्चात्तेन हन्यते।।*

व्याधि आणि शत्रु उत्पन्न होतांक्षणींच समूळ नष्ट केले पाहिजेत. तसें केले नाही तर तें कळत - नकळत हळुहळु वाढतात. आणि त्यांना वाढू देणारी व्यक्ति कितीही धष्टपुष्ट व बलिष्ठ असली तरी तो वाढलेला रोग आणि बलवान झालेला शत्रु त्या व्यक्तीचा नाश करतात.

आपले शरीर सुदृढ असलें तरी त्याच्याकडे आरोग्याच्या दृष्टीनें सतत लक्ष ठेविलें पाहिजे तसेंच आपलें कुटुंब, आपलें घरदार, आपले राष्ट्र यांच्या बाबतींत सतत सतर्क राहिंले पाहिजे. कोणी शत्रु - आंतील वा बाहेरील डोकें वर करीत नाहीं ना इकडे डोळ्यांत तेल घालून दक्ष राहिलें पाहिजे.

उपेक्षा केली तर व्याधि वा शत्रु आपला नाश करील हें सदैव ध्यानांत असावे.

•••

*श्रीमत् सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी*
*(मूळ संहिता व गद्य निरूपणासहित)*
*लेखक प्रभाकर सि. मराठे*
*एकूण पृष्ठे – ८९७ किंमत ८०० रुपये*
*प्रकाशक – केशव भिकजी ढवळे, मुंबई– ४*

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ सर्व महाराष्ट्रात ७०० वर्षांहून आधिक काळ सुपरिचित आहे. वारकरी संप्रदायात सर्वाधिक मान या ग्रंथाला आहे. ज्ञानेश्वरीची भाषा अलीकडच्या मराठी भाषिकांना पटकन् समजणारी नाही. त्यामुळे ज्ञानेश्वरी सोपी करून सांगणारे अनेक ग्रंथ महाराष्ट्रात निर्माण झाले. यापैकी अगदी अलीकडील ग्रंथ श्रीमत् सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी हा आहे. हा ग्रंथ लिहायला लेखक श्री. प्र. सि. मराठे यांना दोन वर्षे लागली.

या ग्रंथात प्रत्येक पानावर डाव्या बाजूला ज्ञानेश्वरीतील ओव्या आणि त्याखाली अर्थ दिला आहे. तर उजव्या बाजूला श्री. मराठे यांची अनुष्टुप छंदातील ज्ञानेश्वरी आहे. अशा तऱ्हेने प्रत्येक पान परिपूर्ण आहे.

भगवद्गीता संस्कृतमध्ये आहे. भगवद्गीतेला गीता असेही म्हणतात. ती सगळ्यांना समजावी म्हणून ज्ञानेश्वरांनी गीतेवर ज्ञानेश्वरीच्या रूपाने मराठीत निरूपण केले. सुरुवातीला त्यांनी ॐकार, श्रीगणेश, वाग्देवी सरस्वती आणि गुरु यांचे स्तवन केले आहे. नंतर महाभारताचा महिमा वर्णन केला आहे कारण गीता हा महाभारताचा भाग आहे. गीतेत ७०० श्लोक आहेत. ज्ञानेश्वरीत ९००० ओव्या आहेत आणि तेवढ्याच संख्येने श्लोक अनुष्टुप ज्ञानेश्वरीत आहेत.

या ग्रंथाला कृष्णभक्त दिवाकर अनंत घैसास यांची प्रस्तावना लाभली आहे. श्री. मराठे यांची अनुष्टुप ज्ञानेश्वरी म्हणजे ज्ञानेश्वरीची धाकटी बहिणच आहे असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी पुढे म्हटले आहे की हे प्रचंड कार्य श्री. मराठे यांनी श्रीकृष्णाच्या कृपेनेच पार पाडले आहे.

श्री. मराठे यांनी या ग्रंथाच्या रूपाने मराठी वाङ्मयात एक नवा इतिहास घडवला आहे. गीतेचे व ज्ञानेश्वरीचे अभ्यासक हा ग्रंथ आस्थेने वाचतील असे श्री. घैसास यांनी पुढे म्हटले आहे. या ग्रंथाला ज्योति ढवळे यांनी माहितीपूर्ण प्रकाशकीय लिहिले आहे.

लेखक श्री. मराठे यांनी सुरुवातीला श्रीमदाद्यशंकराचार्य यांना नमन केले आहे. ''भज गोविन्दम्'' या स्त्रोत्रामुळे श्री. मराठे यांच्या आयुष्याला पारमार्थिक दिशा लाभली. असे त्यांनी म्हटले आहे. लोकमान्य टिळक, श्री. पांडुरंगशास्त्री आठवले, श्री. गोंदवलेकर महाराज, श्री. स्वरूपानंद महाराज आणि लीलाताई या सर्वांना लेखकाने कृतज्ञतापूर्वक वंदन केले आहे.

श्री. मराठे यांच्या कार्याला योगेश्वर कृष्णाची कृपा आणि ज्ञानेश्वरांचा आशीर्वाद लाभला आहे हे त्यांनी स्वत:कबूल केले आहे. ज्ञानेश्वरांनीसुद्धा ज्ञानेश्वरी लिहिताना व्यास आणि शंकराचार्यांचे ऋण वरील शब्दांत व्यक्त केले आहे.

तैसा व्यासाचा मागोवा घेतु ।
भाष्यकारांते वाट पुसतु ।। अध्याय १८.१७२२

या ग्रंथाच्या सुरुवातीला श्री. मराठे यांनी ''ज्ञानेश्वरीचे आगळे वेगळे माहात्म्य'' दिले आहे. सर्व जिज्ञासूंसाठी अत्यंत उपयोगी असे हे माहात्म्य आहे. त्यांतील पुढील शीर्षकांखाली येणारी माहिती सर्वांनी अवश्य वाचावी. कुंडलिनी जागृतीचे वर्णन सायुज्यमुक्ती आणि अद्वैतानंद, ज्ञानेश्वरांची गुरुभक्ती व विनम्रता आणि त्यांनी प्रतिपादिलेले गुरुतत्त्वाचे महत्त्व, अनन्यभक्तीने परमेश्वराशी अनुसंधान साधणे हाच मोक्ष , समाजसेवा, देशसेवा ही सुद्धा परमेश्वराचीच सेवा इत्यादि. संसारातील प्राप्त कर्तव्ये अनासक्त वृत्तीने करण्यानेच खरा परमार्थ साधून प्रापंचिक मोक्षमार्गावर प्रगती करू शकतो असे श्री. मराठे यांनी शेवटी म्हटले आहे.

श्री. मराठे यांनी अनुष्टुप छंदात अनेक ग्रंथांची रचना केली आहे. त्यांची अनुष्टुप ज्ञानेश्वरी ही अगदी अलीकडील रचना. श्री. मराठे यांची ही रचना वाचून जोतिर्भास्कर जयंत साळघावरकर यांनी त्यांना अनुष्टुप सम्राट असे म्हटले आहे.

श्री. मराठे यांची भाषा अत्यंत सुबोध आहे. अनुष्टुप ज्ञानेश्वरीमुळे साधक मंडळींना मूळ ज्ञानेश्वरी समजायला सोपी जाईल. त्यांच्या रचनेत अद्भुत शक्ती आहे. त्यांच्यावर असलेल्या परमेश्वराच्या कृपेची ती निदर्शक आहे असे मला वाटते.

श्री. मराठे हे जरी ८० वर्षांचे असले तरी त्यांनी आपली वाङ्मय सेवा अखंड चालू ठेवावी. त्याकरिता परमेश्वराने त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य प्रदान करावे ही प्रार्थना.

**डॉ. श्री. म. भातखंडे**
विजय निवास, कुंटे वाडी,
भास्कर कॉलनी, महात्मा गांधी मार्ग,
नौपाडा, ठाणे-४०० ६०२.
दूरध्वनी : २५४००८११

•••

**सद्धर्म वाचकांसाठी सूचना व माहिती पाठविण्याचे आमंत्रण....**

आम्ही सर्व सद्धर्मच्या वाचकांस त्यांचे कडे असलेल्या धार्मिक तिर्थ पर्यटनासंबंधी असलेली माहितीचे संकलन वा लेख पाठविण्याचे आमंत्रण देत आहोत. अशी माहिती सद्धर्मच्या सर्व वाचकांस उपलब्द व्हावी म्हणून प्रसिद्ध करण्याचा मनोदय आहे. याची सर्वानी नोंद घ्यावी. निवडक संकलनांना वा लेखांना आपल्या सद्धर्म त्रैमासिकांत प्रसिद्धी देता येईल. माहिती संकलित केली असल्यास तसा उल्लेख ती पाठवितांना त्याखाली जरूर करावा. स्वत: लिहिलेला लेख असेल तर तसे नमूद करावे. तीर्थ पर्यटनासाठी सद्धर्म वाचकासाठी सहकार्य व माहिती उपलब्ध व्हावी ही या मागची संकल्पना आहे. या शिवाय इतर कोणत्याही विषयांचा माहितीचा समावेश सद्धर्मांत व्हावा असे आपणांस वाटत असेल तर आपल्या सूचनांचे स्वागत आहे आपण त्यासाठी आमच्याशी संपर्क साधावा.

## अध्याय ६ : ध्यान योग

**श्रीभगवान पुढे सांगतात:**

योगाभ्यास करितां माझ्या आश्रयाने । तन्मयतेने, नि:शंक चित्ताने ।। तेव्हा मला समग्रतेने । कैसे जाणावे ऐक तू ।।१ ।।

जे जाणितां अवशिष्ट काहीं । जगती या दुजे उरत नाही ।। ते ज्ञान आणि विज्ञानही । पूर्णपणें तुज सांगतो ।।२ ।।

हजारोंतून एखादा उठतो । माझ्या प्राप्तीस्तव प्रयत्न करितो ।। परंतु खरा ज्ञानवंत होतो । त्यांतीलही एखादा ।।३ ।।

जमीन, पाणी, अग्नि, हवा । आकाश, मन, बुद्धि, अहंकार आठवा ।। या अष्टधा तत्वांचा मेळावा । अपरा प्रकृती जाणावी ।।४ ।।

याहूनि श्रेष्ठ परा प्रकृती । जिची चराचरांत आहे वसती ।। संपूर्ण जगताची धारणा शक्ती । तीही घेई समजून ।।५ ।।

या सर्व जगताचे सृजन । होते दोन्ही प्रकृतीपासून ।। म्हणून सकलांचे उगमस्थान । शेवटही मीच असे ।।६ ।।

काहीही नाही माझ्यावाचून । मीच उत्पत्ति लय स्थान ।। मीच सर्वत्र सूत्रासमान । मालेमधील, मण्यांच्या ।।७ ।।

चंद्रसूर्यांची प्रभा, पाण्यांतील रस । वेदांतील ॐकार, पुरुषांचे पौरुष ।। यांत जाणावा माझा वास । आकाशाच्या शब्दांतही ।।८ ।।

मीच पृथ्वीचा सुगंध पावन । सकल भूतमात्रांचे जीवन ।। तपस्वी जनांचे तपाचरण । अग्नीचे दाहक तेजही ।।९ ।।

सर्व पदार्थांचे सनातन बीज । बुद्धीमंतांच्या बुद्धीचे ओज ।। तेजस्वी पुरुषांचे तेज । तेही मीच जाण तू ।।१० ।।

बलवंतांचे बल मीच आहे । जे अनासक्त, वासनारहित राहे ।। धर्मसंमत कामही मी पाहे । सर्वांठायी असणारा ।।११ ।।

सात्विक, राजस, तामस भावना । त्यांची उत्पत्ति मजपासून जाणा ।। माझ्यामध्येच स्थान त्याना । मात्र त्यांच्यात मी नसे ।।१२ ।।

या त्रिगुणात्मक पदार्थानी । हे जगत मोहित होऊनि ।। मजला खरेखुरे न जाणी । अव्यक्त आणि गुणातीत ।।१३ ।।

ही माझी माया त्रिगुणा । तरून जाणे महाकठीण।। जे भक्त येती मजला शरण । त्यानाच शक्य असे हे ।।१४ ।।

मूढ नराधम जे कुकर्मे करिती । मायेमुळें जे अविवेकी बनती ।। आसुरी भावनांच्या आहारी जाती । ते न करिती भजन माझे ।।१५ ।।

चतुर्विध सदाचारी साधक असती । कोणी संसार सुखे मागती ।। संकटग्रस्त, कोणाची जिज्ञासू वृत्ती । कांही प्रत्यक्ष ज्ञानवंत ।।१६ ।।

निष्काम भक्त असा ज्ञानी । एकनिष्ठेने भक्ति करोनि ।। मला सदैव प्रिय आप्त मानी । मलाही तो प्रिय असे ।।१७ ।।

(पृष्ठ ३२ वर)

(मुख पृष्ठावरून)
**संपादकीय**

गेल्या ४५ वर्षांत या समितीच्या शिफारशींवर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

'वर्गहीन' समाजाप्रमाणेच 'गरिबी हटाव' 'समाजवादी रचना,' 'पुंजीवादास विरोध,' 'अल्पसंख्याक' आणि 'मागास वर्गी' यांचा उद्धार असे अनेक ताईत गळ्यात घालून लोकसेवेत व्यस्त असलेल्या लोकप्रतिनिधींच्या वैयक्तिक आणि कौटुंबिक मालमत्तेचे आकडे बघितले की, चक्रावून जायला होते. लोकसभेच्या ५४३ सभासदांमध्ये ३०० सभासद कोट्यधीश आणि १८० सभासद लक्षाधीश आहेत. उत्तर प्रदेशातून सर्वांत जास्त म्हणजे ५२ लोकसभा सभासद करोडपती आहेत. त्याखालोखाल तळागाळातील लोकांचा उद्धार करण्याचे कंकण बांधलेल्या महाराष्ट्रातून निवडून गेलेले ३७ प्रतिनिधी कोट्यधीश आहेत.

भ्रष्टाचार म्हणजे भ्रष्ट आचार. निवडणुकीच्या काळात आचारसंहिता लागू केली जाते; म्हणजे खर्चापासून बोलण्याचालण्यावर निर्बंध येतात. काही संकेतांचे पालन करावे लागते. थोडक्यात, कोणतीही व्यवस्था सुसंस्कृत, संतुलितपणे चालावयाची अपेक्षा असेल तर असे निर्बंध पाळणे, आचारसंहितेचा आदर व पालन करणे अत्यावश्यक असते. आजचा भ्रष्टाचार हा एका सडलेल्या समाजाचे लक्षण आहे. राजकारण्यांच्या भ्रष्टाचाराच्या कथा चवीने चघळाव्याशा वाटतात. त्याचा उगम हा नीतिहीन, चारित्र्यहीन समाजामधेच असतो. अशा समाजाचे सांस्कृतिक, आध्यात्मिक, सामाजिक व राजकीय नेतृत्व हे भ्रष्टच असते. नवीन कायदे हा यावरील उपाय नाही. कायद्यांची संख्या किंवा तिव्रता समाज सुधारू शकत नाही. जबाबदार नीती आणि चारित्र्याचा आदर करणाऱ्या समाजामध्ये कमित कमी कायद्यांची गरज लागते. भ्रष्ट समाज नेहमीच कांगावाखोर आणि सवलतींचा वाडगा घेऊन उभा असतो. योग्य माणसांना सवलती मिळाल्यास कोणाचा त्याला विरोध असणार नाही. महाराष्ट्र सरकारने दुर्बल घटकांमध्ये 'मागासवर्गीय' या शीर्षकाखाली मोडणाऱ्या परंतु आर्थिकदृष्ट्या समाधानकारक असणाऱ्या विद्यार्थ्यांकरता फी मधील सवलती बंद केल्या. ही बाब तर्कसगंत होती. त्यात कोणत्याही प्रकारचा अन्याय नव्हता; तरीही राजकीय पक्षांनी या योजनेसाठी आंदोलने सुरू केली. त्यात हजारो रुपयांचा भ्रमणध्वनी, महागड्या दुचाक्यांवर हिंडणारे अनेक विद्यार्थी गरिबांकरिता असलेल्या फी मधील फायदा घेतात; हा भ्रष्टाचार नाही काय?

भारतीय धर्म संकलनेतील स्मृति साहित्यात समाजाचा सांगोपांग विचार करून जबाबदाऱ्या व आधिकार यांचे वाटप केले होते. परंतु सुधारणांच्या नावाखाली आपण सर्व व्यवस्था नष्ट केल्या. आजच्या भ्रष्टाचाराचे मूळ हे या दिशाहीन मोडतोडीला आहे. नीतिमान, जबाबदार 'वर्ग' रचनेपेक्षा चारित्र्यहीन, नीतिभ्रष्ट वर्गहीन समाज हा जास्त धोकादायक असतो. हे ज्या दिवशी आपल्याला उमगेल, तेव्हा भ्रष्ट आचाराचे निर्मूलन व्हायला सुरुवात होईल. कारण लोकशाही म्हणजे ''लोकांनी, लोकांसाठी, लोकांतर्फे'' निवडलेली व्यवस्था.

●●●

(पृष्ठ ३० वरून)

हे सर्व भक्त उत्तम असती । परी ज्ञानी माझीच प्रतिकृती ।। युक्तचित्तें माझा आश्रय करिती । अंती येती मजकडे ।।१८ ।।

सर्वत्र वासुदेव हे ज्याना ज्ञान । ते भक्त मिळती मजला येऊन ।। अनंत जन्मांची ही संचित साठवण । परी हे अति दुर्लभ असे ।।१९ ।।

ज्यांच्या जैशा अपेक्षा असती । ते तैशा देवतांना भजती ।। ज्यांची जैशी स्वभाव प्रकृती । निवडती देव त्याप्रमाणे ।।२० ।।

आपुल्या देवावरी श्रद्धा ठेवून । करिती उपासना, पूजन, अर्चन ।। स्थिर करितो मी त्यांचे मन । त्या देवाच्या भक्तीमध्ये ।।२१ ।।

अशा स्थिर श्रद्धेने युक्त होवून । करी जो इष्ट देवाचे आराधन ।। त्याचे फल मी देतो मिळवून । माझ्या मते योग्य ते ।।२२ ।।

परी ते फल संपणारे असते । जे अल्पबुद्धीने प्राप्त होते । त्या देवांकडे जाती भक्त ते । मजकडे येती माझे भक्त ।।२३ ।।

अव्यक्तांतून मी साकार होतो । ऐसे मूढ अज्ञानी मानतो ।। माझे खरे रुप न जाणतो । अव्यय आणि उत्तम ।।२४ ।।

मला नसे उत्पत्ति विनाश । ज्ञान नसे हे मूढ जनांस ।। मायेचे आवरण माझ्या रुपास । त्यामुळे मी दिसत नसे ।।२५ ।।

झालेले, असणारे, होणारेही । जाणतो मी सकल भूतमात्रही ।। परी मला न जाणे कोणीही । माझे भक्त वगळतां ।।२६ ।।

इच्छा द्वेष यांपासून । सुख दुःखादि द्वंद्वे उपजून ।। त्याने प्राणिमात्र मोहून । भ्रमित होती अर्जुना ।। २७ ।।

दृढभावाने उपासना करित राहातो । सर्व पापांतून मुक्त होतो ।। माझी भक्ती जो करीत राहतो । दूर सारोनि मोहाना ।।२८ ।।

माझ्या आश्रयाने प्रयत्न करून । मुक्त होती जरा मृत्यू पासून ।। त्याना ब्रह्म अध्यात्म उमजून । समजती सर्व कर्मेही ।।२९ ।।

अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ तथा ।। यांसह मजला जाणती स्वरुपत: ।। अंतकाळ त्यांचा समीप येतां । स्मरण माझे ठेविती ।।३० ।।

रहस्य विज्ञानसहित ज्ञानाचे । वर्णन सर्वव्यापी भगवंताचे ।। मोठेपण भगवद्भक्तांचे । आसुरी लोकांचे अवगुण ।।

व्यक्ती तितक्या प्रकृती । वेगवेगळी दैवते भजती ।। ईश्वराला त्याचे भक्तचि जाणती । ज्ञान विज्ञान योग समाप्त ।।

**।।श्रीकृष्णार्पणमस्तु ।।**

●●●

**संपादकीय :** डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक :** अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे – ४०० ६०१.
**मुद्रण स्थळ :** परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१.